
# माणूस

शनिवार । ३१ मे १९८० । ७५ पैसे



हिंदुस्थानची सर्वप्रथम शाही गाडी ठरण्याचा मान हिला मिळाला...
पृष्ठ....२

## शिवाय

- या अंकापासून क्रमशः सुरू होत असलेल्या हिचकॉकच्या कथा पृष्ठ...१७
- दिग्दर्शक अनंत माने यांची वेगळी मुलाखत पृष्ठ...२०

डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा एक प्रेरक ग्रंथ.... पृष्ठ १०

# सप्रेम नमस्कार

## आसाम संघर्षामधून प्रांतीयवाद व शीतयुध्द

◻ श्री. विनय सहस्रबुद्धे यांचे आसाम व नजीकची राज्ये याविषयीची लेखमाला अतिशय सखोल अभ्यासपूर्ण असून त्यांचे निरीक्षण सूक्ष्म आहे. असमी जनता धर्मांतराच्या चक्रात किती तरी वर्षे अडखळून पडली असून त्यांना निर्भयपणे बाहेर काढणे दुरापास्त झाले आहे. त्यांनी हा सर्व भाग मोठ्या कौशल्याने सर्व मुद्द्यांच्या कारणमीमांसेसह लेखमालेतून उभा केला ही विशेष गोष्ट वाटली.

परकीय नागरिकांना आसाममधून घालवून देण्याच्या तत्त्वाबाबत सरकारही अनुकूल दिसते. मात्र तपशिलामध्ये एकवाक्यता अद्यापी होऊ शकत नाही ही चिंतेची बाब झाली आहे. एक खरे की आज-उद्या या प्रश्नाची तड लागून हीही प्रक्रिया सुरू होईल. तसेच त्यातून उद्भवणारे दोन धोकेही लक्षात येतात. आसामादी भाग 'ख्रिश्चन स्टेट' करण्याच्या प्रयत्नात परदेश सहभागी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यातून युरोपीय राष्ट्रे-इंग्लंड-अमेरिका गैरफायदा उठविण्याचीही शक्यता आहे. याच संधीतून सर्वात जवळचे चीन राष्ट्र सर्वांआधी आसामात उतरण्याची संभाव्य घटनाही लक्षात घेणे आवश्यक आहे. मग रशिया या चढाओढीत मागे कसा राहील? म्हणजेच सर्व जगाचा हस्तक्षेप या भागात राहणार! त्यातून आपले सरकार कसा काय मार्ग काढणार ही एक टांगती तलवारच आहे.

परकीय नागरिकांना आसाममधून बाहेर घालवून देण्याच्या संदर्भात जी दहा दहा वर्षांची योजना सुचविण्यात आली आहे, ती एक मध्यम मार्ग म्हणून सांगण्यात येते. त्या योजनेने कोणाचे समाधान होणार असेल ते होवो; परंतु ते तत्त्व मान्य केल्यास त्याचाच आधार घेऊन त्याप्रमाणे प्रत्येक राज्यात अशाच प्रकारचे लढे निर्माण होणार नाहीत याची हमी कोण देणार? अमक्या राज्यात अमुक राज्यातील नागरिकांना प्रवेश बंद, स्थायिक होता येत नाही असे वृत्त आपण वृत्तपत्रांतून वाचतो. स्वतंत्र भारताच्या कोणाही नागरिकाला आता कोठेही स्थानांतर करता येत नाही हे दुर्दैव वा सुदैव हे कसे समजावे? उदाहरण म्हणून महाराष्ट्राचे घ्यावयास काही हरकत नाही. महाराष्ट्रातील मुंबई, पुणे व इतर जिल्ह्यांच्या मोठमोठ्या शहरी भारतातील निरनिराळ्या राज्यांतील नागरिक व्यापाराच्या वा नोकरीच्या निमित्ताने प्रचंड संख्येने गेली अनेक वर्षे येत आहेत, राहात आहेत, स्थायिक होताहेत. मुंबई-पुण्याची लोकसंख्या प्रचंड प्रमाणात वाढली आहे व वाढतच आहे. ती कशामुळे वाढली, त्यातील निरनिराळ्या राज्यांचे किती नागरिक आहेत, कोण स्थायिक झाले आहेत वगैरे प्रश्नही त्यामुळे निर्माण होत आहेत. आज त्याची परिस्फुटता झाली नाही; पण उद्याची हमी कोण देणार? काही वर्षांपूर्वी मुंबईत शिवसेनेने अशाच तऱ्हेचा एक उपक्रम केला तो लक्षात असेलच.

म्हणून आसाम-प्रश्नामधून देशांतर्गत यादवी निर्माण होण्याची तसेच आंतरराष्ट्रीय समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे असे दिसते. त्यावरही सहस्रबुद्ध्यांसारख्या चिकित्सक निरीक्षकाने वास्तववादी चित्र उभे करावे अशी विनंती आहे. आपण हा एक योग्य उपक्रम योग्य वेळी अंमलात आणला याबद्दल धन्यवाद.

२५ मे ८० सॅमकाका, पुणे

◻ 'माणूस'मधून क्रमशः प्रसिद्ध झालेले श्री. विनय सहस्रबुद्धे यांचे आसामच्या प्रश्नावरील अभ्यासपूर्ण लेख मी साक्षेपाने वाचले. पूर्वांचलामधील विविध राज्यांचा त्यांनी घेतलेला राजकीय, सामाजिक व धार्मिक छेद फारच आवडला. ते तीन्ही लेखही मी औत्सुक्याने वाचले. या आठवड्यात येणाऱ्या चवथ्याकडे डोळे लागून राहिले आहेत.

विनय सहस्रबुद्धे या तरुणाने आसाम व अरुणाचलातील समस्यांचे प्रत्यक्ष हिंडून-फिरून, माहिती जमवून, मुलाखती घेऊन

**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकोणिसावे
अंक : त्रेपन्नावा
३१ मे १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन
अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत
असतीलच असे नाही.
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक
संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर
यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे
छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३० दूरध्वनी ४४३४५९

इतके मर्मग्राही विश्लेषण' करावे याचे कौतुक वाटले. वर्तमानपत्रात येणाऱ्या बातम्यांवरून सर्वसामान्य वाचकाच्या मनात या प्रश्नांबाबत जो एक गोंधळ माजून राहिला होता तो दूर करून नेमक्या प्रश्नांवर सहस्रबुद्धे यांनी बोट ठेवले आहे. त्याबद्दल त्यांचे मनापासून अभिनंदन करताना एक विनंती मी आपल्याला करतो. सहस्रबुद्धे यांच्या लेखमालेची कात्रणे जपून ठेवायला हवी होती; पण मी ते केले नाही हे सारे लेखन आता एकत्र स्वरूपात वाचकांना मिळायचे तर ते पुस्तकरूपात प्रसिद्ध व्हायला हवे. ही राष्ट्रीय महत्त्वाची कामगिरी आहे हे ध्यानी घेऊन आपण ते पुस्तक प्रसिद्ध करण्याचे मनावर घ्यावे अशी आग्रहाची विनंती आहे. मला वाटते याबाबतीत मी एकटा नाही. कारण अनेकांच्या मनातला विचारच मी इथे लिहिला आहे.

२३-४-८० राम बिवलकर, मुंबई

¤ प्रवासात असल्याने गेल्या काही आठवड्यांचे 'माणूस'चे अंक वाचायचे राहून गेले होते. प्रवासाहून परतताच आवर्जून वाचले तेव्हा एका अंकात प्रा. चंद्रशेखर राजे यांचा 'डोंबिवली परिसरातील छोटया उद्योजकांच्या समस्या' विषयीचा प्रदीर्घ लेख वाचनात आला. एका जिव्हाळ्याच्या प्रश्नावरील उत्कृष्ट लेख वाचल्याचे समाधान झाले. त्या परिसरातील छोटया उद्योजकांच्या मुलाखती घेऊन प्रा. राजे यांनी हा अभ्यासपूर्ण लेख लिहिला आहे. त्यामुळे उद्योजकांच्या समस्यांवर तर प्रकाश पडला आहेच; पण शासकीय यंत्रणेच्या 'किडलेपणा'चे देखील भेदक दर्शन घडविले गेले आहे.

२३ मे ८० र. श्री. जोशी, दादर

# 'हम नया बाग बनाएंगे'

"मरनेसे कुछ दिन पहले जयप्रकाशजीने मुझसे कहा था, 'वाजपेयी, बाग तो उजाड गया!' मैने वह स्वीकार करते हुए कहा, 'जयप्रकाशजी, आप चिंता मत कीजिये, हम फुलोंका नया बाग बनाएँगे...'

भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष, प्रभावी वक्ते, झुंजार नेते, माजी परराष्ट्रमंत्री अटलबिहारी वाजपेयी यांची रसवंती वहात होती. अहमदाबादच्या 'जयप्रकाश नारायण चौका'त जवळजवळ चाळीस हजार श्रोते मंत्रमुग्ध होऊन ऐकत होते. निवडणूक प्रचाराची ही सभा होती. (दि. २० मे)

वाजपेयी सांगत होते, 'जयप्रकाशजींनी लावलेली फुलबाग आमच्या अंतर्गत मतभेदांमुळे, झगडयांमुळे उजाड झाली, सर्वत्र 'काटे'च जास्त वाढले; पण आम्ही घाबरून मागे हटणार नाही! नवी बाग निर्माण करू. फुलांनीच 'काटयां'ना चिरडून टाकू!'

टाळयांच्या कडकडाटात श्रोते दाद देत होते. जनता पक्षाच्या स्थापनेचा आणि विघटनाचा तळमळीन उल्लेख करताना अटलजींमधला कवी सांगत होता.

'एक सपना था जो चकनाचूर हो गया
'एक लक्ष्य था जो हमसे दूर हो गया
'एक मनोराज था
'जो टुकडे टुकडे होकर बिखर गया!'

पण आम्ही माघार घेणार नाही. एक स्वप्न भंगलं म्हणून हताश होणार नाही. राष्ट्राच्या समृद्धीसाठी नवी स्वप्नं आम्ही निर्माण करू. राष्ट्रसैनिकांची शिस्तबद्ध सेना भारतीय जनता पक्षाजवळ आहे. तिच्या सहाय्यानं आम्ही या स्वप्नपूर्तीसाठी झटू, झगडू; पण मागे हटणार नाही!'

या निर्धाराला पुन्हा एकदा टाळयांनी प्रतिसाद. देशांतर्गत विविध प्रश्नांबद्दलचं धोरण, परराष्ट्रधोरण, आसामचा प्रश्न अशा अनेक विषयांवर अटलजी विचारपूर्ण काव्यमय शैलीत तळमळीनं बोलत राहतात. जवळजवळ सव्वा तास श्रोते त्या रसधारेत न्हात राहतात.

अटलजी सांगतात, 'वरचं नाव न पाहता आपल्या जुन्या प्रगतिपुस्तकातल्या कमी गुणांबद्दल मुलाला रागावणाऱ्या पित्याची गोष्ट मी ऐकली आहे; पण ते प्रगतिपुस्तक मुलाचं नव्हतं, स्वतःचंच होतं हे कळल्यावर तो खजिल होतो. आज पंतप्रधान इंदिरा गांधी असंच करत आहेत. स्वतःच्या राजवटीतल्या अनेक दोषांचं खापर जनता सरकारच्या राजवटीच्या माथी मारत आहेत. ही लोकांची फसवणूक आहे आणि सच्च्या राजनीतीशी फारकत आहे. आम्ही सत्तेवर आलो तेव्हा काँग्रेसच्या तीस वर्षांच्या राजवटीतल्या भल्या-बुऱ्या सर्वांचीच जबाबदारी घेऊन वाटचाल सुरू केली. फक्त मागच्या राजवटीच्या नावानं आक्रोश करत बसलो नाही! 'मी काही करू शकत नाही!' असं तुम्ही म्हणत असाल तर मग सत्तेवर राहता तरी कशाला?'

...नर्म विनोद, प्रसंगावधान, खुसखुशीत किस्से अशा सर्वांगांनी एक आनंदानुभव देणारं हे व्याख्यान. सतत उंचावत गेलेलं. अखेरच्या तळमळीच्या आवाहनानं अटलजी त्याचा कळस गाठतात. 'आज संजय आणि त्याचे साथीदार संसदेत आम्हा विरोधकांना बोलू देत नाहीत. आमचा आवाज उमटू देत नाहीत. लोकसभा निवडणुकीत तुम्ही लोकांनी त्यांना दिलेल्या बहुमतामुळे संसदेत विरोधी आवाज दडपला जातो आहे. तेव्हा झालं ते झालं, त्याबद्दल आमची तक्रार नाही; पण आज विधानसभा निवडणुकीत मात्र पूर्ण विचार करा! आज किमान संसदेबाहेर तरी आम्ही आवाज उठवू शकतो आहोत. विरोधकांना मतं दिली नाहीत तर संसदेत आणि संसदेबाहेरही विरोधी मतभेदाचा आवाज उमटणारच नाही! मग एकसुरी, एकछत्री साम्राज्य निर्माण होईल आणि तेव्हा लोकशाही संपलेली असेल! म्हणून लोकशाही जगवायची असेल तर विरोधी पक्षांना मतं द्या, एवढीच माझी विनंती आहे!' □

# मुंबई-पुणे ! शाही गाडीची ५० वर्षे

आजची मध्यरेल्वे जेव्हा जी. आय. पी. रेल्वे या नावाने ओळखली जाई तेव्हा, ५० वर्षांपूर्वी १ जून १९३० या दिवशी झालेली डेक्कन क्वीनची सुरुवात हे या रेल्वेच्या इतिहासातील एक प्रमुख पदचिन्हच ठरले. महाराष्ट्राची राजधानी मुंबई आणि ज्या नगरीला महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी तसेच 'दक्खनची राणी' या औचित्यपूर्ण नावानेही ओळखले जाई ते पुणे या दोन शहरांच्या दरम्यान सुरू झालेली डेक्कन क्वीन पहिलीच शाही गाडी होती. या पहिल्या द्रुतगामी गाडीला सात डबे होते. यापैकी एक अॅल्युमिनियमने रंगविलेला होता आणि त्यावर गडद लाल रंगाची सजावट होती. इतर डबे रॉयल ब्ल्यू रंगावर सोनेरी रेषा असे होते. यामध्ये ६१ प्रथम वर्ग प्रवाशांची आणि १५६ द्वितीय वर्ग प्रवाशांची तसेच १९ परिचारकांची बसण्याची सोय होती. या गाडीतील सुखसोयी, त्या काळात इंग्लंड आणि इतर देशांत प्रवाशांना मिळणाऱ्या सुखसोयींच्या तोडीच्या होत्या. या गाडीने घालून दिलेल्या सुखसोयींच्या आदर्शाचे नंतर १९६४ साली आग्रा आणि नवी दिल्ली या दरम्यान सुरू झालेल्या ताज एक्सप्रेसमध्ये अनुकरण करण्यात आले.

पहिल्या डेक्कन क्वीनच्या डब्यांचे अंडर-फ्रेम्स इंग्लंडमध्ये बांधण्यात आले. तथापी डब्यांचे बांधकाम मात्र जुन्या जी. आय. पी. रेल्वेच्या माटुंगावर्कशॉपमध्ये केले गेले. हे डबे बाहेरून टीक लाकडाचे असून ते पोलादी पॅनेल प्लेटस् आणि मोल्डिंग्जवर आधारित होते.

या गाडीच्या अन्तर्गत सजावटीकडे खास लक्ष देण्यात आले. या गाडीचा पहिल्या वर्गाचा हिस्सा, प्रत्येक डब्यात वरच्या बाजूस बूर वॉलनट आणि मोल्डिंग्जमध्ये झरोकेदार सजावटीने विभागलेला होता. डब्यांचा आतील पृष्ठभाग करड्या रंगाच्या जाजमाने आच्छादलेला होता आणि बसण्याच्या जागा रबराच्या गादीवर महिषीचर्म आच्छादून तयार केल्या होत्या. दुसऱ्या वर्गाचे डबे निरनिराळ्या आकृत्यांच्या तुकड्यांच्या साहाय्याने सजविले होते आणि खिडक्यांवर ब्राक्सीलियन झेब्रा लाकडांची पॅनेलस आणि वालनट मोल्डिंग्जची सजावट होती.

## उपहारगृह

पहिल्या आणि दुसऱ्या वर्गाच्या प्रवाशांसाठी अलग अलग उपाहारगृहांची व्यवस्था होती. या दोहोंच्यामध्ये स्वयंपाक-घर होते. या व्यवस्थेमुळे उपहार पुरविण्याची जलद सोय उपलब्ध झाली. पुणे आणि मुंबई यामधील प्रवास केवळ ३ तासांचा असल्यामुळे फक्त अल्पाहार पुरविण्यात येई. स्वयंपाक विजेच्या साह्याने बनविण्यात येई. याकरिता स्वयंपाकगृहात ग्रील्स, स्टीमिंग ओव्हन्स, फिश फ्रायर्स, बॉयलर्स आणि विजेचा रेफ्रिजरेटर इत्यादी साधने पुरविलेली होती. रेफ्रिजरेटरमुळे अन्नपदार्थ साठविण्याची एक आदर्श व्यवस्था होत होतीच; पण त्यामुळे थंड पेये केव्हाही मिळण्याची सोय होती.

डब्यांमध्ये वायुवीजनाची-'एअर व्हेंक'च्या साधनाची सोय होती. त्यामुळे गाडीतील हवा प्रत्येक सहा-सात मिनिटांनी पूर्णपणे बदलविली जात असे. डब्यामध्ये पुरेशा उजेडाची आणि पंख्यांची सोय होती. बांबूच्या जाळीची सोय असलेल्या मोठ्या खिडक्यांमुळे गाडी ज्या ज्या भागातून जात असे तेथील निसर्गदृश्ये पाहाणे प्रवाशांना शक्य होई.

## नवीन साज

१९६६ साली अगदी नव्या बांधणीचे डबे जोडून या डेक्कन-क्वीनला नवे रूप देण्यात आले. यामुळे बसण्याची व्यवस्था, उपहार व्यवस्था इ. बाबतीत, प्रवाशांना जास्तीत जास्त सुखसोयी प्राप्त झाल्या. या नव्या रूपामागची कल्पना आणि आरेखन म्हणजे माटुंगा वर्कशॉपची कारागिरी आणि आटोकाट नियोजन यांचे दृश्य फल होते. अशा उच्च कोटीच्या कामामुळे माटुंगा वर्कशॉपची कीर्ती अधिकच वाढली.

प्रवाशांना बसण्याचे सुख होण्यासाठी नव्या डेक्कन क्वीनमध्ये संपूर्ण कॉइल्ड स्प्रिंग बोगीजसह अँटी टेलिस्कोपिक इंटर्नल शेलची योजना केलेली होती. डब्यांच्या आतील पृष्ठभाग प्लॅस्टिकच्या टाइलसनी चकचकीत झालेला होता. यामुळे डब्यांची शान तर वाढलीच; पण यामुळे ध्वनिशोषणही होत होते. पहिल्या वर्गाच्या डब्यांमध्ये पुढेमागे करता येण्याजोग्या खुर्च्या, पिण्याचे थंड पाणी आणि कागदी पेले, बाथरूम आणि प्रसाधन-कक्षातील पायाच्या साहाय्याने सुरू करता येणारे नळ आणि पंख्याचे पुशबटन-नियंत्रक आणि विजेच्या नळचा ही नव्या डेक्कन क्वीनची काही मुख्य वैशिष्ट्ये होती. वरच्या वर्गाच्या डब्यांच्या आतील भिंती प्रवाशांना आवडतील अशा रंगीत चित्रांनी सजविलेल्या होत्या.

## बैठकव्यवस्था

या गाडीला नवीन पुरविलेल्या डब्यांमुळे, १२ कोचेसमध्ये, ५८८ प्रवाशांची सोय होती, पहिल्या वर्गाच्या ७ कोचेसमध्ये ३०८ मागे-पुढे सरकणाऱ्या खुर्च्या होत्या आणि तिसऱ्या वर्गात २८० प्रवाशांची सोय होती. या गाडीत ३० प्रवाशांची बसण्याची व्यवस्था असलेली डायनिंग कार, जड सामान ठेवण्याची दोन लगेज कार्स आणि स्वयं-विद्युत्-जनित्रे होती. कोचेसची बांधणी संपूर्ण वेल्डेड स्टील शेलसपासून इंटिग्रल कोच फॅक्टरी पेरांबूर येथे करण्यात आली. पहिल्या वर्गाच्या डब्यांना आणि डायनिंग कारला

मोठ्या खिडक्या होत्या आणि सर्व कोचेसना डब्यातील जागचा अधिक चांगला वापर-होण्यासाठी ६ इंच अधिक उंची मध्यभागी ठेवण्यात आली.

रंगाच्या उपयोग आणि गाडीच्या अंतर्भागातील सजावट याकडे अधिक लक्ष पुरविण्यात आले. डक्कन क्वीनच्या बाहेरील बाजूचा रंगयोजना तिच्या वैशिष्टयासह कायम ठेवण्यात आली; परंतु अंतर्भाग मात्र, डोळ्यांना आल्हाद देणाऱ्या, किंचित करड्या रंगाच्या डेकालम प्लॅस्टिक तक्त्यांनी आधुनिक पद्धतीने सुशोभित करण्यात आला. हा बदल केवळ सुखकारच झाला नाही तर आल्हाददायकही ठरला.

पहिल्या वर्गातील डब्यांचा तसेच डायनिंग कारचा आतील पृष्ठभाग निळ्या आणि करड्या रंगातील चाकडाच्या टाइल्सचा बनविल्याने तो केवळ आकर्षकच झाला नाही तर चालण्यास सुखावह झाला. तिसऱ्या वर्गाच्या डब्यातील जमीन सुखद अशा हिरव्या मोझक टाइल्सनी सजविण्यात आली. दोन्ही बाजूकडील ब्रेकव्हॅनमध्ये सामान ठेवण्याची सोय करून गाडीतील पहिल्या वर्गाचे डबे हे चेअरकार म्हणून बांधण्यात आले. प्रवासात लागेल अशा छोट्या सामानाची सोय करण्यासाठी हलक्या बॅगजसाठी लाइट लगेज रॅक्स सर्व डब्यांत पुरविण्यात आले. याशिवाय पहिल्या वर्गाच्या डब्यामध्ये एक लहान सामान-घर असे. त्यात प्रवाशांना आपल्याबरोबर हवे असलेले सामान ठेवण्याची सोय होती.

काचेच्या भिंतीवर, मुंबई आणि पुणे या दरम्यान असलेल्या स्थानिक प्रवासी आकर्षण स्थळांची रंगीत चित्रे लावून त्या अधिक सुशोभित करण्यात आल्या. डब्यांच्या भिंतीवरील स्टेनलेस स्टीलचे मोल्डिंग्ज आकर्षक नमुन्याचे होते. तसेच फ्रेंच पॉलिशने चकचकीत केलेल्या लाकडी मोल्डिंग्जने डब्याच्या एकूण अंतर्गत सजावटीमध्ये भरच घातली. प्रवाशांना आपल्या डब्यातून जेवण-घराकडे जाण्याची थेट सोय सर्व डब्यात होती. याकरिता डबे टेस्टिब्यूलच्या साह्याने एकमेकास जोडलेले होते.

## आधुनिक उपाहार-यान

उपाहार-यान, हॉट केस, हॉट अँन्ड कोल्ड पॅन्ट्रीज, डीप फ्रोज आणि स्वयंपाकास आवश्यक अशी सर्व विजेची साधने इ. आधुनिक सोयींनी युक्त होते. उपाहारगृहातील टेबलांचे पृष्ठभाग, सहज स्वच्छ होण्यासाठी व जास्त टिकावेत म्हणून मिनेटेड शीटसनी तयार केलेले होते. खुर्च्यांच्या बैठका विणलेल्या होत्या. उपाहारयानातील अप्रत्यक्ष प्रकाशव्यवस्था आणि आधुनिक कलापूर्ण साधनांनी सजविलेला अंतर्भाग यामुळे मध्य-रेल्वे विभागीय खानपान सेवामार्फत पुरविण्यात येणाऱ्या पाकक्रियेची लज्जत अधिकच वाढली होती.

या गाडीच्या डब्यांची रचना करताना प्रवाशांचा प्रवास सुखकर व्हावा याकडे खास लक्ष देण्यात आले. पहिल्या वर्गाच्या प्रत्येक डब्यात ४४ आसने होती. या डब्यातील खुर्च्यांची रचना अशी होती की, एकास दुसरी अगदी लागून. अशा खुर्च्यांच्या दोन रांगांमधून जाण्या-येण्यासाठी रस्ता ठेवलेला होता. या खुर्च्या पुढे-मागे सरकण्याच्या सोयीच्या असून त्या हव्या तशा ठेवता येण्याजोग्या होत्या. यांवर रबराच्या गाद्या असून त्या निळ्या व्हायनाइड लेदरने आच्छादलेल्या होत्या. खिडक्यांना उन्हापासून संरक्षण देणाऱ्या सोयिस्कर गडद रंगाच्या काचा होत्या. खुर्च्यांच्या प्रत्येक जोडीला प्रवाशांचा सहज हात पोचेल अशा ठिकाणीच तक्तपोशीतच दिवे व पंखे याकरिता पियानो-टाइप बटण होती. प्रत्येक डब्यांत तीन प्रसाधनकक्ष आणि एक वॉश बेसिन होते.

तिसऱ्या वर्गाच्या प्रत्येक डब्यात तसेच तिसऱ्या वर्गाच्या लगेज व ब्रेकव्हॅनमध्ये अनुक्रमे ९० व ५० प्रवाशांची सोय केलेली होती. यातील खुर्च्या एका रांगेत अगदी लागून अशा पाच व समोर तशाच पाच अशा प्रकारे ठेवलेल्या असून त्या घट्ट बसविलेल्या लाकडी सीटच्या होत्या. दोन खुर्च्यांच्या तिहेरी रांगांमधून जाण्या-येण्यासाठी रस्ता ठेवलेला होता. पॅनेल्स आणि मोल्डिंग्जच्या रंगसंगतीत साजेल अशा पद्धतीने या बैठका पॉलिश केलेल्या होत्या.

## सध्याचे रंग-रूप

डेक्कन क्वीनला सुरुवातीस फक्त पहिल्या व दुसऱ्या वर्गाचे डबे जोडलेले होते. १ जानेवारी १९४९ पासून पहिला वर्ग रद्द करून त्या वेळच्या दुसऱ्या वर्गाचे रूपांतर पहिल्या वर्गात करण्यात आले. ही व्यवस्था १ जून १९५५ पर्यंत चालू होती. त्या वेळेस प्रथमच या गाडीस तिसऱ्या वर्गाचे डबे जोडले गेले. याच तिसऱ्या वर्गाचे नंतर दुसरा वर्ग असे ४ एप्रिल १९७४ रोजी नामकरण करण्यात आले.

डक्कन क्वीनची सध्याची रचना अशी आहे. एकूण १२ डब्यांपैकी पाच पहिल्या वर्गाचे आणि सात दुसऱ्या वर्गाचे डबे आहेत. यामध्ये ३०० पहिला वर्ग प्रवाशांची आणि ४०० दुसरा वर्ग प्रवाशांची बसण्याची व्यवस्था आहे. मुंबई व्ही. टी. आणि कर्जत, लोणावळा, पुणे या दरम्यानचे सीझन तिकिटधारकांना खास त्यांच्यासाठी राखून ठेवलेल्या स्वतंत्र पहिल्या व दुसऱ्या वर्गाच्या डब्यांमधून या गाडीने प्रवास करण्यास परवानगी आहे.

जेव्हा ही गाडी १९३० मध्ये प्रथम सुरू झाली तेव्हा एकेरी प्रवासाचे भाडे पहिल्या वर्गासाठी फक्त ११ रु. ४ आणे आणि दुसऱ्या वर्गासाठी ५ रु. १० आणे होते. आज हे भाडे ४३ रु. आणि १० रु. असे आहे. ही गाडी एक वेगवान गाडी म्हणून खास सोडण्यात येत असल्याने पहिल्या वर्गाच्या प्रवाशांकडून रु. ५-०० आणि दुसऱ्या वर्गाच्या प्रवाशांकडून रु. १/- असा पूरक आकार वसूल केला जातो. हे जादा भाडे १ एप्रिल १९७३ पासून डेक्कन क्वीनच्या आरक्षित डब्यातून प्रवास करणाऱ्यांना द्यावे लागते.

□


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या
आयर्व्हिंग स्टोनच्या
जगप्रसिद्ध कलाकृतीचा
मराठी अनुवाद

अनुवादिका
माधुरी पुरंदरे
प्रकाशक
प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे

# संध्याकाळचे पुणे

दि. बा. मोकाशी

# अरे ! ये पाकिस्तान है ।

वसंत व्याख्यानमालेतील दि. १३।५।८० चे पुष्प गुंफताना प्रा. श्रीमती कुलसूम पारेख 'मेरी पाकिस्तान यात्राएँ' या विषयांवर बोलल्या. त्या म्हणाल्या,

इ. स. १९४८ मध्ये मी पाकिस्तानला गेले तेव्हा पाकिस्तान काय आहे हे कळत नव्हते. तेव्हा सेक्रेटरीएट नव्हते. ... भारतातून एक नवाबसाहेब तीन बिव्या घेऊन आले. एकीला भारतात विसरले. त्याला घर दिलं पण वर छप्पर नव्हतं. त्यांनी तक्रार केली तेव्हा संबंधित अधिकारी म्हणाला, 'यहाँ बारिश नहीं होती, नवाबसाब ! अरे ! ये पाकिस्तान है' त्यावेळी पाकिस्तानात हीच भावना भरून होती, पाकिस्तान झालं; आता काय हवाय ? हा सर्वसुखी देश होणार! अरे ! ये पाकिस्तान है !'

आपल्या व्याख्यानारंभी स्वतःची ओळख करून देताना प्रा. कुलसुम पारेख म्हणाल्या,

वीस दिवस एखाद्या देशात राहून आल्यावर त्यासंबंधी बोलणं धाडसाचं. एकोणिसशे अठ्ठेचाळीस ते एकूणऐंशीपर्यंत मी सहा वेळा पाकिस्तानात गेले. ४८।५३।५४।६३।६४ व ७९अशा साली या भेटी दिल्या. त्यामुळे मला तुलनात्मक कल्पना आली. पुष्कळ मुसलमान पाकिस्तानात पूर्वग्रह घेऊन जातात, मी हमीद (दलवाई) बरोबर काम केले आहे. मी तिथे जे आहे ते सांगेन, मी एम. ए. ला मुसलमान संस्कृती शिकवते व बी. ए. ला हिंदु तत्वज्ञान शिकविले आहे. दोन्ही संस्कृतींचा अभ्यास असल्यानं मी तौलनिक सांगू शकेन असे वाटते.

इ. स. १९४८ सालचं, अरे ! ये पाकिस्तान है! हे वातावरण मी १९६३।६४ ला गेले तेव्हा नव्हते. तेव्हा पाकिस्तानात भयंकर भारतविरोधी व हिंदुविरोधी भावना होत्या. वातावरण भयंकर होते. मुले रस्त्यातून ओरडत जात, 'नेहरु कुत्ता है– पाकिस्तान जिंदाबाद– हिंदुस्तान मुर्दाबाद!' मी जिथे राही त्यांना विचारी हे असे का ? ते ते म्हणत, 'आम्हाला शाळेत असे शिकविले आहे!' ते ऐकून मला अतिशय भीती वाटली. रेडिओवरून सुद्धा 'नेहरूंची प्रेतयात्रा निघाली आहे– इंदिरा रोती है' असली गाणी असत. आमचा नोकर गुजराथी होता. नेहरूजी पाकिस्तानात आले तेव्हा तो म्हणाला, 'नेहरूजी गुजराती मुसलमानांना चांगले होते !'

प्रा. कुलसुम पारेख म्हणाल्या, 'मी १९५४ साली पाकिस्तानात गेले तेव्हा हजारो माणसं रक्तदानाला तयार आहेत असं दिसलं. लोकांची परिस्थिती खूप चांगली होती... जिथे जावे तिथे पंजाबी मुसलमान व सर्व उद्योग पंजाबी मुसलमानांच्या हातात होते. 'चलो दिल्ली!' घोषणा घुमत होत्या. रस्ते स्वच्छ होते. ज्या सामाजिक सुधारणा हिंदी मुसलमानांना मान्य नव्हत्या त्या तेथे मान्य केल्या गेल्या. त्या अमलात किती आल्या ते वेगळं. पण आज हिंदी मुसलमानासमोर सिव्हिल कोड कुणी बोलू शकत नाही हे लक्षात घेतलं तर तिकडे स्थिती बरी होती. रस्ते कसे स्वच्छ होते याची एक गोष्ट आहे. लाहोरमध्ये एका घराच्या गॅलरीत एक प्रतिष्ठित नागरिक शेंगा खात वरून टरफले खाली रस्त्यावर टाकीत होता. समोर कोपऱ्यावर मिलिटरीचा शिपाई उभा होता. तो शांतपणे ते पहात होता. शेंगा खाणाऱ्याने शेंगा खाऊन रुमाल झाडला, हात तोंड पुसले तेव्हा तो पोलीस पुढे आला आणि त्याने त्या नागरिकाला म्हटले,

'खाऊन झाल्या शेंगा ?'

नागरिक म्हणाला 'हो !'

'पोलीस म्हणाला 'मग, खाली या !'

नागरिक खाली येताच शिपाई म्हणाला, 'आता रस्त्यावर टाकलेलं एक एक टरफल गोळा करून तुमच्या रुमालात बांधा आणि पलीकडच्या कचरापेटींत टाकून या !'

नागरिकाने मुकाट्याने सर्व केले. या सर्व गोष्टी पाहून मला वाटले हा देश आमच्यापुढे जातोय. त्यांच्या आवेशाची मला तर भीतीच वाटली. पाकिस्तान झाल्यावर एका एका कुटुंबात वाटणी झाली. एक भाऊ इकडे राहिला, एक तिकडे गेला. माझे नव्वद टक्के नातलग तिकडे आहेत.

¤

हिंदुस्तानातील मुसलमानांना त्यांचा देश मिळाला. 'अरे ! ये पाकिस्तान है !' ते हर्षाने ओरडले, पण इकडे फार मोठा घाव बसला, जे माझ्या वयाचे आहेत त्यांच्या ऐन उमेदीत ही घटना घडली. कित्येकांचे तोंडात जन्माची कडू चव आली; पण पाकिस्तान येणार याची चिन्हे केव्हाच होती. जिथे मुसलमान वस्ती आहे अशा गावातून तर, जर अर्थ नीट लावता आला असता तर ती चिन्हे तेव्हाच कळली असती. काही वर्षे मुसलमानातला उद्दामपणा वाढला होता. बोलणी बदलली होती. माझ्या परिचयाचा एक माझ्याहून जरा लहान तरुण मुसलमान माझ्या डोळ्यांपुढे येतो. तो मुंबईस मुसलमानी कॉलेजात जावयाचा. तो नेक्टाय, बूट-मोजे, कडक कोट व पॅंट घालावयाचा. तसा तो घरचा श्रीमंत नव्हता; पण पोषाख इंग्रजी व कडक ठेवणं ही तऱ्हा सर्व शिकणाऱ्या

मुसलमान मुलांची होती व तो पोषाख कायदे-आझम जीना यांची नक्कल होती. आपल्याकडे जशी पं. नेहरूंच्या पोषाखाची नक्कल झाली. जीना व्याख्यानास उभे राहिले की ही तरुण पोरं तशाच कडक पोषाखात मागे उभी रहात. गम्मत अशी वाटते की पहिल्या स्वातंत्र्यदिनी कडक युरोपियन पोषाखातील जीनांनी, माउंट बॅटनला सिंहासन दिले नाही. तर साध्या पोषाखातील म. गांधी व पं. नेहरू यांनी माउंटबॅटनना सिंहासनावर बसवले. पाकिस्तानचा प्रश्न निघाला की हा तरुण मुलगा गालात धूर्त हसे. जे तरुण जीनांच्या भाषणाचे वेळी मागे रांगेत उभे राहून समोरच्या जीनांचे भाषण न कळणाऱ्या मुसलमानांना, त्यांनी कुठे टाळ्या वाजवावयाच्या हे कळण्यासाठी आधी टाळ्या वाजवीत ते तरुण पाकिस्तान झाल्यावर जीनांबरोबर तिकडे जाणार यात संशय नव्हता. म्हणून मी त्या तरुणाला एकदा विचारले, 'तूही तिकडे जाणार असशील !' तो हसून म्हणाला, 'छे छे! आम्ही का जायचं ? आम्ही आमची जागा का सोडू ? तिकडे पाकिस्तान होईल ते त्यांचं होईल !'

आम्ही इकडे आणखी पाकिस्तान करण्यासाठी थांबणार आहोत असे तो तरुण कधी स्पष्ट बोलला नाही. पारिखबाईंनी जे पुढे सांगितले की इकडून श्रीमंत मालदार मुसलमान पाकिस्तानात गेले आणि गरीब, मध्यम वर्गातला मुसलमान इथे राहिला, त्या मध्यम वर्गातला वरील तरुण होता. या मुंबईकडील मध्यम वर्गाने पाकिस्तानच्या कल्पनेचा वणवा पेटविला. पाकिस्तानात न जाण्याचे गरीब मुसलमानांचे कारण दारिद्रय हे होते. या मध्यमवर्गीय तरुणांचे कारण वेगळे होते.

आज हा तरुण साठीत आला असेल, आता त्याच्या कल्पना काय असतील ? पारेखबाईप्रमाणे तो कधी आपल्या स्वप्नाच्या देशात जाऊन आला असला तर आपल्या बांधवांना त्याने काय सांगितले असेल ? दक्षिणेत दुसरे पाकिस्तान निर्माण करण्याच्या त्याच्या कल्पना अजून तो आपल्या मुलानातवात भरवीत असेल का ?

१९७९ च्या जुलैत पंधरा दिवस श्रीमती पारेख पाकिस्तानात होत्या. पुष्कळांशी बोलल्या. त्यांचे मातबर नातलग तिथे होते. शिष्यही होते. तेही मालदार आहेत; पण जे मूळ पाकिस्तानी ते तिथे टॅक्सीवाले व रिक्षावाले आहेत. या वेळी विमान बारा तास उशिरा पोहोचलं. प्रश्न आला शहरात जाण्यास रिक्षा मिळेल का ? कुणी बजावलं, 'बहेन ! हे पाकिस्तान आहे. तीनशे-चारशे रुपये रिक्षावाला मागेल व कुठे सोडील कुणास ठाऊक ?' विमानातला एक प्रवासी म्हणाला, 'बहेन ! मी तुम्हाला घरी सोडीन. काळजी नको. मी स्मगलर आहे. मिडलईस्टहून माल आणतो. भरूचजवळ माझे गाव आहे. तिथे मुसलमान राहिलेला नाही ! मी त्या गावी कळवले की माझं मूळ गाव पहायला येतोय. त्याप्रमाणे मी गेल्यावर गावकऱ्यांनी हार घालून माझे स्वागत केले !' डॉ. कुलसुम पारेखनें त्याला विचारलं, 'भारतात तुम्हाला काय चांगलं वाटलं ?' तो म्हणाला, 'माझ्या गावापासून दोन मैल एक मंदिर आहे. तिथे मी लहानपणी जात असे. तिकडे फिरायला गेलो आणि काय सांगू बेहेन ? मंदिर पुन्हा पाहून माझं जीवन धन्य झालं, (मुझे अम्मा मिली) ताई मी मक्केला जाऊन आलेला आहे. बहेन ! पाकिस्तानांत कुठे एकटी जाऊ नकोस. ये पाकिस्तान है ! उठा ले जाऊंगा तुझे.

¤

नंतर डॉ. कुलसुम पारेख यांनी १९७९ साली पाकिस्तानात पाहिलेली आर्थिक, सामाजिक व धार्मिक स्थिती सांगितली. आर्थिकबद्दल त्या म्हणाल्या, 'देखावा फार उत्तम. सर्व पैसा व्यापारी, उद्योगपती, डॉक्टर, वकील यांच्या हाती आहे. मुंबईत महिन्यात पंधराशे रुपयात भागतं तिथे पाकिस्तानात पाच हजार खर्च येतो.वीस रुपये किलो मटण. नारळ अकरा रुपयास. पान चार रुपये. तूप नाही. दूध म्हणजे पाणीच पाणी. तीन हजार कामगार असलेली रफीज टेक्स्टाइल एका रात्रीत बंद केली. संप का केला नाही ? मी विचारलं–'काय गोळी खायची आहे ?' उत्तर आले–तिथे पासष्ठ रुपयास ही बॅग घेतली (व्याख्यातीनं बॅग वर करून दाखवली. तीन महिन्यात खलास ! ही पस्तीसची छोटी बॅग, ही पण तीन महिन्यात खतम. जी वस्तू घ्याल ती तकलादू—तिथे लाल बझार म्हणून बाजार आहे. पाकिस्तानातले तिथे जात नाहीत. हा बाजार स्मगलिंगच्या मालांनी भरलाय व तेथे सगळे हिंदुस्तानी मुसलमान भरले आहेत. पाकिस्तानी म्हणतात या हिंदुस्तानी मुसलमानांनी आम्हाला खलास केलं. येथून वस्तू घेऊन जातात— इथे मोफत इस्पितळे आहेत; पण कुठे जावे तिथे फॉर्म भरा. वागणंही विचित्र. मरावे तर हिंदुस्तानांत येऊन असे लोक म्हणतात— आयूबचे सोशल रिफॉर्म गेले. भाकरीत मीठ फार घातले म्हणून बायकोला घटस्फोट-तलाख. हे इथे सुद्धा आहे; पण येथल्यापेक्षा फारच प्रमाणात तिथे आहे.

'इस्लामी हुकमतीत दारू अंडर ग्राऊंड झाली, व्हिस्की बॉटल ५०० रुपये. रमझानच्या पाक महिन्यातल्या उपवासानंतर दारू. इस्लामी बंधुत्व कुठे नाही.––मला एकजण म्हणाली !' 'तू पाकिस्तानी नाहीस ?' मी म्हटलं, 'तू कसं ओळखलस ?' ती म्हणाली 'तू सलाम करतेस त्यावरून !' असं आहे की मी आपल्याकडील हैद्राबादी पद्धतीचा सलाम करते म्हणजे बोटं जुळवून कपाळाशी नेऊन, मान किंचित लववून, जुळलेली बोटं चार पाच वेळा लववून सलाम करावयाचा. त्यात विलक्षण सौंदर्य मला वाटते. पाकिस्तानी मैत्रीण म्हणाली, 'असा सलाम आम्ही इथे करू शकत नाही. कारण इथले पंजाबी मुसलमान म्हणतात 'तुम्ही निजामाचे गुलाम आहात. गुलाम त्याला असा सलाम करीत ? ते आमची टिंगल करतात. गुलाम म्हणतात.' मुसलमान भाई भाई पण इतर मुसलमान पंजाब्यांना फार घाबरतात––कॉलेजमध्ये जाणाऱ्या मुलींना तर रोड साइड रोमिओ रस्त्याने चालू देत नाहीत. कॉलेजात नेमलेली पुस्तके नाहीत. साधी साधी टेक्स्टबुक नाहीत. विद्यार्थी चाकू घेऊन वर्गात बसतात.

'धर्माचे बाबतीत पठाण फक्त रोझा नमाज भक्तिभावाने पाळतात बाकी सर्व ढोंग करतात. रोझाच्या दिवसात हिंदूंसाठी खाण्याचे पदार्थ करण्याची एके ठिकाणी परवानगी दिली तर मुसलमानांच्याच हजारोंच्या रांगा लागतात––तिथल्या स्त्रिया म्हणतात, आमच्या मुलाला हिंदुस्तानातील मुसलमानाची कन्या पहा. येथील मुली आवारा आहेत. हिंदुस्तानच्या साध्या असतात ! पाकिस्तानांत हिंदू दिसलेच नाहीत. इथे मुसलमान पूर्वापार पोषाख ठेवू शकल्याने मुसलमान कळतो; पण पाकिस्तानात राहणारा हिंदु सर्वच हिंदुपण लपवतो.

त्याला पोषाखही मुसलमानीच करावा लागतो. मौलाना महँज यांनी म्हटले आहे,

' हिंदुस्तान मे मुसलमान नही रहे '

' पाकिस्तान में इस्लाम नही रहा '।

यापैकी दुसरे खरे आहे; पण पहिले साफ खोटे आहे. जमशेटपूरच्या दंगलीवरून निघालं. त्याना इथं मुसलमानांना कापतात असं सांगितलं जातं. मी म्हटलं ' जमशेटपूरला हुल्लड झाली याचा अर्थ दोघात मारामारी झाली. म्हणजे मारामारी करण्याइतके मुसलमान तिथे स्वतंत्र आहेत. तसे नसते तर कत्तल झाली असे म्हटलं असतं. पाकिस्तानात हिंदूंनी असा यत्न केला तर कत्तलच होईल त्यांची '. यावर कुणी उत्तर दिले नाही. भुट्टो गेल्यावर लोकांना तो गेला हे पटत नव्हते. जमाते इस्लामने म्हटले ' उत्तम '. मी टॅक्सीमधून जात होते. टॅक्सीवाला फ्रॉंटियरचा पठाण होता. तो म्हणाला, ' जीना साबकी क्या मजाल ! (जीनासाहेब केवढे सामर्थ्याचे ! ) इसी कंबक्तने (भुट्टो) हमको परेशान कर दिया. हमारे भविष्य में अंधेरा है--आपके देश में (भारतात) डेमॉक्रसी है हमको क्या मिला है ?'

' तेथील बुद्धिवंतांनी मला विचारले, ' हिंद पाकिस्तान कॉन्फिडरेशन बारेमें आपका क्या खयाल है ?'...मी सत्यशोधक मंडळाचे काम करते याबद्दल तिथले बुद्धिवान म्हणत--' छान काम करता. हिंदूत सिक्युलॅरिझम जागृत आहे. हिंदी मुसलमानात तो नाही हे वाईट आहे. हिंदूत सहिष्णुता फार आहे. भविष्यात हिंदूमुसलमान एक होतील.' मतामतामधून पाकिस्तानी बुद्धिमंत व इतरही हिंदूंच्या मतांशी एकरूप वाटतात. त्यावरून हिंदी मुसलमान शिकोत. क्रिकेटटीममधेही पठाण हिंदूला घेत नाहीत. नोकरीत हिंदू नाही.'


☐

श्रीमती कुलसुम पारेख यांच्या या व्याख्यानातून पाकिस्तानचे इतके स्पष्ट दर्शन झाले की, त्यावर काही लिहिण्याची आवश्यकता नाही. देश खंडित झाला या दुःखाची न भरणारी जखम म. गांधी, पं नेहरू यांच्यापासून सर्व हिंदूंना झाली. रक्ताच्या नद्या वाहिल्या, द्विभाजन झाले. यात चूक दोघांची असेल; पण आता द्विभाजन झाल्यावर पाकिस्तानातले मुसलमान विचार करू लागले आहेत तो महत्त्वाचा आहे. वेगळे राज्य मिळूनही ते सुखी का नाहीत ? मी त्याचे काहीसे वेगळे कारण काढले आहे. ते पटेल का पाहावे. पाकिस्तानातील मुसलमानांची ही अवस्था त्यांची त्यांच्यामुळेच झाली. हे मुसलमान प्रथम अखंड हिंदुस्तानातले. अखंड हिंदुस्तानातील मुसलमानांचा पिंडच निराळा बनला होता.तो अरबी मुसलमानांचा नव्हता--तो तुर्की मुसलमानांचा नव्हता--तो अफगाणी मुसलमानांचा नव्हता. इथले मुसलमान काही शतके राजे होते. हिंदू ही त्यांची काफीर प्रजा होती. काफीरांना मारणे, त्यांचे धन, स्त्रिया, पोरे घेणे या करण्यात मुसलमानी धर्माप्रमाणे विधिनिषेध नव्हता. येथे हिंदू जास्त व मुसलमान कमी होत. त्यामुळे असे हिंदूंना फसवीत, लुबाडीत शतकावर शतके आरामात जगत राहणे मुसलमानांना जमले. फारसे कष्ट न करता असे जगता येत असल्याने तीच त्यांना सवय लागली. याची असंख्य उदाहरणे सबंध हिंदुस्तानभरची देता येतील. या सवईमुळे हिंदू लज्जास्पद जिणे जगत राहिले, मुसलमानांना पोषीत राहिले; पण मुसलमानांवरही त्याचा वाईट परिणाम झाला. त्यांची बोलणी ऐटीदार होत गेली; पण कर्तृत्व गेले. नंतर पाकिस्तान झाल्यावर तेथे फक्त मुसलमान राहिले व पंचाईत आली. ज्यांना लुबाडावयाचे ती जमातच नाही. त्यांना परस्परांना खात राहावे लागले. जीना गेल्यावर तिथे राजवटी कोसळू लागल्या, खून पडले. तरी पण अजून त्यांना पिळून घेण्यासाठी बांगला मुसलमान होता. तोही स्वतंत्र झाल्यावर मात्र पंचाईत आली.

पाकिस्तानातील मुसलमानांच्या परपुष्ट प्रवृत्तीचे, त्यांच्या अपयशांचे माझे हे कारण कुणाला पटेल न पटेल. मला वाटते पाकिस्तानातील घडामोडी पाहताना या वृत्तीचा अभ्यास करायला हवा. आता जरी तेथील काही बुद्धिमानांना याचे आकलन झाले असले तरी सुद्धा ते संपूर्ण नाही. स्वतःची चिकित्सा ते करू शकत नाहीत. अजूनही तिकडचे मुसलमान दिल्लीवर चालून येण्याच्या कल्पनेने उल्हसित होतात, अजून त्यांना वाटते की, मोगल कालापासून शतकानुशतके जी अवस्था होती ती यावी. एकदा धमाल उडवून हिंदुस्थान घ्यावे व या काफिरांना राबवीत, लुबाडीत आरामात राहावे ! पाकिस्तान ऱ्हासाला लागले तर हीच वृत्ती कारणीभूत होईल. देश या वृत्तीतून उभा राहात नसतो.

प्रा. कुलसुम पारेख यांनी एकदा सांगितले की, पाकिस्तानातील मुसलमान घरात आपापली प्रादेशिक भाषा बोलतात म्हणजे सिंधी, पंजाबी, कच्छी, बंगाली वगैरे. फक्त तेथला महाराष्ट्रीय मुसलमानच आपल्या प्रदेशाची-मराठी-भाषा बोलत नाही. तेथील महाराष्ट्रीय मुसलमानांचे सोडा, इथले महाराष्ट्रीय मुसलमानही मराठी भाषा बोलत नाहीत. आम्ही मराठी बोलत असता तो उर्दूच बोलत राहील. तो इथे उर्दू शाळा मागेल, इस्लामी कायदा सोडणार नाही. तो इथे उर्दूला मान्यता मिळावी म्हणून आपली मते वापरील. या सर्वांमागे हिंदूंवर आपला वरचष्मा ठेवायचा हीच भावना असते. न्यूनगंड असतो व अजूनही पूर्वीचे दिवस आणू असे त्यांना वाटत असते की काय कुणास ठाऊक ?

हा सर्व प्रकार दुःखद आहे. अर्थातच जसे पाकिस्तानातील काही बुद्धिवान शिकले तसे आपले मुसलमानही सिक्युलॅरिझमचे महत्त्व जाणतील. धार्मिक तंटेबखेडयांचा अंत होण्यासाठी आणि या उपखंडात शांतता नांदून उत्कर्ष होण्यासाठी निधर्मीपणा राबवणे आवश्यक आहे. आज जरी येथील मुसलमान व ख्रिश्चन धर्मीयांचे वळण तसे नसले तरी लवकरच ते भारतीय संस्कृतीशी समरस होतील. कारण त्याशिवाय त्यांना उत्कर्ष नाही. हे त्यांना कळो !



# स्त्रीमुक्ती की ऋणमुक्ती ?

## शैला सुळेशी बातचीत

चंद्रशेखर राजे

साने गुरुजींनी धडपडणाऱ्या मुलांना प्रेरणा दिली, प्रयत्नवादाची कास धरण्याचे शिक्षण दिले. महाराष्ट्रातील अनेक क्षेत्रांत ही धडपडणारी मुले काम करताना दिसतात. म. गांधींनी महाराष्ट्राला कार्यकर्त्यांचे मोहोळ म्हटले. डॉ. बाबा आमटे यांनी तरुणाईला साद घातली. महाराष्ट्रात जिद्दीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची वाण कधीच भासली नाही. ह्या साऱ्यांनी पेटवलेल्या पणत्या, चेतवलेली मने आपापल्यापरीने कार्यमग्न आहेत. व्यक्तिगत सुखाला तुच्छ मानून, आपला पोटापाण्याचा व्यवसाय नेकीने करून फावला वेळ सामाजिक कार्यासाठी कारणी लावण्याचे वेड घेतलेली अशीच एक धडपडणारी मुलगी ठाण्यात राहते. अखिल भारतात प्रथमच महिला रेल्वेप्रवाशांची संघटना तिने स्थापन केली आहे. यशाची धुंदी नाही आणि अपयशाने खचणे तिला ठाऊक नाही. रोज उगवणारा दिस नित्य नव्या कल्पना घेऊनच येतो. त्या साकार करण्यासाठी आवश्यक असणारी बौद्धिक कुवत तिच्याजवळ आहे. नेटाने कार्य करण्यासाठी हवे असणारे संघटनाकौशल्यही आहे. सारे प्रश्न रस्त्यावर येऊनच सुटतात वा सोडवले पाहिजेत असे न मानणारी, सनदशीर राजकारणाची कास न सोडणारी पण आपले प्रश्न धसाला लावणारी, त्यासाठी साऱ्यांची दारे ठोठावणारी ही मुलगी म्हणजे स्त्रीमुक्ति चळवळीचा एक चैतन्यपूर्ण आणि विधायक आदर्शच आहे. घरात आणि घराबाहेरही स्त्रीचे जीवन सुखी व्हावे यासाठी जिवाचे रान करीत आहे.

अशा ह्या धडपडणाऱ्या मुलीचे नाव आहे कु. शैला र. सुळे, एम्. ए., एम्. कॉम्. जॉफे मॅनर्स ह्या विख्यात कंपनीच्या जाहिरातविभागात अधिकारी म्हणून काम करते, राजकारण व समाजकारण यात हिरीरीने भाग घेणे हा तिचा पिंड आहे. त्यासाठी वाटेल तेवढे श्रम करण्याची तिची तयारी आहे. अशा ह्या कार्यकर्त्या मुलीचे मनोगत जाणून घेण्यासाठी तिच्याशी केलेल्या या मनमोकळ्या गप्पा —

**मी :** आपले शिक्षण, आवड इ. बद्दल थोडेसें सांगाल काय ?

**शैला :** मी मुंबई विद्यापीठाच्या एम्. ए. आणि एम्. कॉम. ह्या पदव्या घेतल्या. त्याचप्रमाणे लंडन मार्केटिंग इन्स्टिटयूटचा मार्केटिंग डिप्लोमा घेतला आहे. आकडेशास्त्र हा माझा अत्यंत आवडीचा विषय आहे. डोकेदुखीचा विषय न ठरता माझा तो छंदच झाला. शास्त्रशुद्ध माहिती गोळा करणे व विश्लेषण करणे हा माझा विरंगुळा आहे. कॉलेजमधील साऱ्या चळवळीत भाग घेतला. रुईया आणि पोद्दार या दोन कॉलेजेसनी मला घडविले. जॉफे मॅनर्समध्ये नोकरी करते आहे.

**मी :** आपण मूळच्या शिवसेनेच्या कार्यकर्त्या. आता जनता पक्षात. विशेषत: जनता समाजवादी फोरममध्ये कशा आलात ? हा प्रवास कसा घडला ?

**शैला :** मला शिवसेनेची मराठी माणसावरील अन्यायाची भूमिका पटली. शिवसेनेची त्या कारणासाठी आजही आवश्यकता आहे; पण शिवसेनेने आणीबाणीत घेतलेली भूमिका आणि श्रीमती इंदिरा गांधींना दिलेला पाठिंबा मला मान्य नव्हता. त्यामुळे सेना सोडली. अॅड. सूर्यकांत वढावकरांमुळे समाजवादीपक्षात आले आणि मग जनतापक्षात आले. माझ्या प्रवासाची सुरुवात समाजकार्यापासून झाली आहे आणि समाजकार्यातच तो संपणार आहे.

**मी :** ठाणे नगरपालिकेची निवडणूक लढविलीत ती केव्हा आणि कशासाठी ? परिणाम कोणता झाला ?

**शैला :** इ. स. १९७४ च्या नोव्हेंबरमध्ये मी ठाणे न. पा. ची निवडणूक शिवसेनेच्या तिकिटावर लढवली. फॉर्म भरल्यापासून एक गोष्ट व ती शेवटपर्यंत पाळली आणि ती म्हणजे निवडणूकप्रचार उच्च पातळीवर ठेवायचा. राजकारण न आणता, अप्रामाणिकपणा न करता, कायद्याच्या कक्षेत राहूनच निवडणूक लढवायची. शिवसेनेच्या उमेदवाराकडून असे ऐकणे बऱ्याच जणांच्या कल्पनाशक्तीबाहेरचे असेल; पण माझ्या बाबतीत ते सत्य होते. परिणाम व्हायचा तोच झाला. मी हरले. मी पराभूत झाले तरी माझी मान ताठ होती. विजयी झालेल्या माझ्या प्रतिस्पर्ध्याने काढलेले "शैला, तू पराभूत व्हायला नको होतीस ! "

हे उद्गार मला दिलासा द्यावयास पुरेसे आहेत.

**मी :** त्यानंतर काय केलेत ? हरलात म्हणून घरी बसलात काय ?

**शैला :** पराभवाने खचून जाणे आणि स्वस्थ बसून राहणे हा माझा पिंडच नाही. जानेवारी १९७५ मध्ये पाचपाखाडी ह्या ठाण्याच्या प्रचंड झोपडपट्टीत काम करायचं ठरविलं. श्री. वसंत सावंत यांच्यासारखे सहकारी मिळाल्यामुळे हे काम करणे मला सहज शक्य झाले.

**मी :** झोपडपट्टीत आणि तुमच्यासारख्या उच्चविद्याविभूषित आणि अधिकारपदी असणाऱ्या स्त्रीने काम करणे हे कसे शक्य झाले ? अनुभव कोणते आले ?

**शैला :** पाचपाखाडी परिसरातील साऱ्यांच्या मदतीने आम्ही कार्याला सुरुवात केली. परावृत्त करण्याचा प्रयत्न झाला. 'एकटी-दुकटी त्या भागात जाऊ नकोस.' असा सल्लाही मिळाला. 'तू हे असले काम करू नकोस,' असे सांगितल्यामुळे मी जास्त जोमाने व जिद्दीला पेटून काम करायला लागले, अगदी मारण्याच्या धमक्या मिळाल्या तरीही !

**मी :** म्हणजे नेमके काय केलेत ? अतिविशाल महिलामंडळाच्या सभासदांसारखे Knitting वगैरे शिकवलेत काय ?

**शैला :** त्या दोन वर्षांच्या काळात स्त्रिया व मुले यांच्यासाठी मोफत वैद्यकीय केन्द्र

सुरू केले. देवीची लस टोचण्याची तर मोहीमच काढावी लागली. ह्या आरोग्यविषयक कामाबरोबरच त्यांना एकत्र आणण्यासाठी हळदीकुंकूसमारंभ, बैठका, चर्चा इ. कार्यक्रम आखले. त्या वेळेस आरोग्याची, कुटुंबनियोजनाची माहिती दिली.

**मी :** इतर कोणाची खास मदत झाली काय ?

**शैला :** होय . डॉ. अलका कोरडे यांचे अमूल्य साह्य झाले. डॉ. भानुशालींनी दरमहा रु. १००/– मदत देऊ केली.

**मी :** झोपडपट्टीच्या पाहणीकडे कशा वळलात ? स्वरूप कोणते होते ?

**शैला :** काम करताना त्यांच्या जीवनाशी निगडित अशा विविध समस्या लक्षात आल्या. त्या अडचणी दूर करणे आमच्या आवाक्याबाहेरचे होते. त्यांची शास्त्रशुद्ध पाहणी करून समाजापुढे, सरकारसमोर ठेवणे आवश्यक वाटले. त्यांची आर्थिक कुवत, शिक्षण इ.बद्दल पाहणी केली व त्याचा अहवालही प्रसिद्ध केला. संबंधित मंत्र्यांना हा अहवाल दिलाही.

**मी :** तुम्ही आतापर्यंत कोणकोणत्या पाहण्या (Surveys) केल्या आहेत ? उद्देश काय ?

**शैला :** (१) पाचपाखाडी झोपडपट्टीतील राहणीची पाहणी इ. स. १९७५,

(२) ठाणे–बेलापूर परिसरातील सुशिक्षित बेकारांची पाहणी इ. स. १९७८,

(३) महिला प्रवाशांची (रेल्वे) अडचणींची पाहणी.

त्याशिवाय मराठी नियतकालिकांची पाहणी अशा विविध तऱ्हेच्या पाहण्या केल्या आहेत. जे चालले आहे ते सारे मुकाटपणे सहन करू नका हे सांगणे आणि अडचणी कोणत्या आहेत हे जगासमोर ठेवणे, हे उद्देश आहेत. जेथे स्त्रियांवर अन्याय होतो व त्यांना अडचणी सहन कराव्या लागतात, तेथे तेथे मी माझ्या कुवतीनुसार काम करते. यातून मला ना राजकीय स्वार्थ साधायचा ना मला प्रसिद्धीची हाव !

**मी :** तुम्ही ज्या पाहण्या करता त्या आणि सरकार करीत असलेल्या त्याच प्रकारच्या पाहण्या यात फरक काय ? तुम्ही तुमची शक्ती वाया का घालविता ?

**शैला :** सामान्य माणूस हा आमच्या पाहणीचे केंद्रस्थान आहे. सरकारी दृष्टिकोन आणि आमचा दृष्टिकोण यात फरक आहे. सामान्यतः अडचणी आणि अपेक्षा, त्यांचे विचार आणि सूचना आमच्या पाहणीतून आढळतील. जे न देखे रवी, ते देखे कवी हे विसरू नका! आमचे कार्य तळमळीतून निर्माण झाले आहे. पैशाच्या वा प्रसिद्धीच्या मोहाने नाही !

**मी :** महिला प्रवाशांची पाहणी करताना काय आढळले ? स्त्री म्हणून काही लपवू नका. ही पाहणी कोणत्या वर्गातील स्त्रियांची ?

**शैला :** ही पाहणी सुशिक्षित, मध्यमवर्गीय, कमावणाऱ्या आणि रेल्वेने प्रवास करणाऱ्या महिलांची होती.

**मी :** तुम्हाला कष्टकरी, बहुजनसमाजातील स्त्रियांचे हाल दिसले नाहीत काय ?

**शैल :** तुम्ही आमची प्रश्नपत्रिका नीट पहा. आमचा हा पहिला टप्पा (Phase I) आहे. या अनुभवानंतर आम्ही बहुजनसमाजातील कष्टकरी स्त्रियांची पाहणी करणारच आहोत. झोपडपट्टीपासून कामाला सुरुवात करणाऱ्या मला त्याचे वावडे नाही. मी तुमच्या अगोदरच्या प्रश्नाकडे वळते. उपनगरी महिला प्रवाशांची पाहणी करताना, त्या स्त्रियांची उदासीनता, असहकार, संशयी स्वभाव, आत्मविश्वास नसणे इ. गोष्टी खटकल्या. पाहणी म्हणजे काय हेच ह्या सुशिक्षित स्त्रियांना ठाऊक नव्हते. आपली मिळकत कळली तर आयकर अधिकारी घरी चौकशीला येतील, दुपारी आमची मुले एकटी घरी असतात, या बाईने घरी जाऊन चोरी केली तर ? अशा अनेक शंका त्यांनी काढल्या.

**मी :** खास मध्यमवर्गीय प्रतिक्रिया आहेत ग्रा. आणखी काही Typical प्रतिक्रिया सांगाल काय ?

**शैला :** ' याने काही होणार आहे का ? ' रेल्वेचा कारभार सुधारणार आहे का ? तुमच्या लाडक्या रेल्वेमंत्र्यांनी–श्री. मधू दंडवते यांनी काहीही कृती न करून (आमच्या अहवालाला साधी पोचही दिली नाही) त्यांच्या या शंका खऱ्या करून दाखविल्या यात संशयच नाही. आमच्या शास्त्रशुद्ध पाहणीचे रेल्वेने तीन तेरा वाजविले. काय हो ' आघाडी ' या नावाला तुमचे मंत्री, सरकार, मंत्रालय घाबरते काय ? (बाईंचा मलाच प्रश्न) यातूनच महिला प्रवासी संघटनेची सुरुवात झाली.

**मी :** जरा सविस्तर सांगाल काय ? अखिल भारतात तुम्हीच प्रथम महिला रेल्वेप्रवाशांची संघटना निर्माण केलीत म्हणून विचारतो.

**शैला :** सारेजण ' आघाडी 'ला घाबरले असावेत, त्यांना यात काही तरी राजकीय हेतू दिसला असावा किंवा दुसऱ्या कोणाला तरी आमच्या श्रमाचे श्रेय द्यायचे असेल म्हणून रेल्वेकडून आम्हाला प्रतिसाद मिळाला नसावा ! हे लक्षात घेऊन आमचे (स्त्रियांचे) प्रश्न सोडविण्यासाठी महिला प्रवासी संघटना असणे अत्यावश्यक वाटले. नव्हे ती काळाची गरजच आहे म्हणा ना.

**मी :** रेल्वे प्रवासी संघटना असताना हे नवे पिल्लू कशाला काढलेत ?

**शैला :** इतक्या साऱ्या प्रवासी संघटना आहेत त्यांनी महिलांच्या काही खास अडचणी आहेत आणि त्या निवारण केल्या पाहिजेत असे समजून काही केल्याचे न ऐकिले न पाहिले. म्हणूनच आम्ही आमची संघटना निर्माण केली.

**मी :** इतर कोणाकोणाची मदत मिळाली ? कामे खूप आहेत आणि तुम्ही काय एकटयाच हे करणार काय ?

**शैला :** एकटीने हे काम होण्यासारखे नाहीच. या संघटनेची जास्तीत जास्त जबाबदारी घेण्याचे डोंबिवलीच्या समाजवादी कार्यकर्त्या कु. अलका नाबर यांनी मान्य केल्यामुळेच ही संघटना आकाराला येऊ शकली.

**मी :** ह्या कामी पुरुषांची मदत घेणार काय ?

**शैला :** आमच्या न्याय्य मागण्यांसाठी लढताना आम्ही साऱ्यांचीच मदत घेऊ. पुरुषांचे वावडे असण्याचे कारणच काय ? पण आम्ही आमच्या पायावरच उभ्या राहू इच्छितो.

**मी :** तुम्हा महिला प्रवाशांच्या मागण्या कोणत्या आहेत ? महिलांसाठी स्वतंत्र गाडया हव्यात काय ? डब्यांची समान वाटणी हवी काय ?

**शैला :** आम्हाला उपनगरी गाडीच्या नऊ डब्यांपैकी साडेचार डबे नको आहेत. दूर अंतरावरच्या (कर्जत-कसारा इ.) गाडयांना दहा डबे असावेत व ह्या अधिक डब्यांचा २।३

भाग स्त्रियांसाठी व १।३ भाग पुरुषांसाठी असावा. पुरेसे पोलीससंरक्षण, महिलांच्या डब्यांतून पुरुषांनी केव्हाही प्रवास न करणे इ. अनेक मागण्या आहेत. आजची मागणी म्हणजे मधली दारे आहेत ती तत्काळ बंद करावीत. स्त्रीपुरुष समान आहेत. एक श्रेष्ठ व दुसरा कनिष्ठ असे मी मानत नाही; पण गंमत म्हणून सांगते 'शक्ती' हा शब्द स्त्रीवाचकच आहे ना ?

मी : स्त्रीमुक्तिचळवळीबद्दल काय वाटते ?

शैला : हा प्रश्न विचारून तुम्ही माझी पंचाईत केली आहे. या विषयाचा सखोल अभ्यास मी केला नाही. स्त्रीजागृती प्रथम झाली पाहिजे असे माझ्या आजवरच्या कामावरून वाटते. त्यानंतरच स्त्रीमुक्तीचा विचार करणे सोपे जाईल. रूढी, परंपरा, गृहकृत्य इ. चे जोखड फेकून देणे ही कल्पना मुक्तीमागे असेल तर स्त्रीच्या मनात पोकळी तर निर्माण होणार नाही ना अशी शंका मला भेडसावते. बऱ्याच अहिल्या शिळा असून त्याबद्दल त्या खंत बाळगताना दिसत नाहीत हे माझे दुःख आहे.

मी : हे कसे साधणार ? काही उपाय सांगाल का ?

शैला : स्त्रियांच्या आणि पुरुषांच्याही दृष्टिकोनात फरक पडत नाही तोपर्यंत मुक्ती नुसती कागदावर वा कल्पनेतच राहणार आहे. पुरुषप्रधान समाजरचना बदला, पुरुषांना बदला आणि मगच परंपरेला चिकटून राहिलेल्या स्त्रीला मुक्त करा. स्त्रीमुक्तिनेत्या श्रीमती मार्गारेट मीड म्हणतात ते मला पटते. त्या म्हणतात, 'मुलीला वाढवताना तिला स्त्री म्हणून वाढवू नका, माणूस म्हणून वाढवा !'

मी : आपली वाढ बालपणापासून कशी झाली ? कोणते वेगळे संस्कार झाले ?

शैला : आम्हाला आमच्या वडिलांनी समान वागणूक दिली. जेव्हा मुलगी म्हणून वेगळे वागयला सांगितले–उदा. पूजा करा. पूजेला जा, बांगड्या घाला इ.– तेव्हा मी विरोधच केला. माझ्या मनासारखेच वागले. प्रत्येकीने असेच वागावे.

मी : आपण करता ते सारे रिकामटेकडेपणाचे उद्योग आहेत असे म्हणू का ?

शैला : मी जे काही करते ते करण्याची माझ्यावर सक्ती नाही आणि मी रिकामटेकडीही नाही समाजकार्य ही रिकामपणाची कामगिरी आहे असे मी मानीत नाही. काही श्रद्धा, काही मूल्ये मानणारी मी आहे. समाजाचे ऋण फेडणे ही भावना माझ्या कामापाठी आहे. असे काम करण्याची इच्छा होणे हे संवेदनाक्षम मनाचे लक्षण आहे असे मी मानते. या कामातून मला समाधान मिळते. मनाचे समाधान होणे हे माझ्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याला तुम्ही रिकामटेकडेपणा म्हणा वा वेडेपणा म्हणा, मला त्याची पर्वा नाही.

मी : रागावणार नसलात तर विचारतो. आपण ज्या जातीत जन्माला आलात त्या जातीचे वैशिष्टच आपल्यापुरते पाहण्याचे आहे. असे असताना आपण ही सामाजिक ऋणाची व्यापक कल्पना कशी स्वीकारलीत?

शैला : माझ्या घरचे वातावरण जातपात मानणारे नव्हते. माझ्या वडिलांच्या व्यवसायामुळे साऱ्या जातिधर्मांचे लोक घरी येत असत. काही कारणास्तव माझ्या वडिलांनी जातीशी संबंधही ठेवला नाही. त्यामुळे जात हे प्रकरण घरात आलेच नाही. जातीला चिकटलेले दुर्गुण कमी झाले; पण अजिबात गेले नाहीत. उदाहरणार्थ उशिरा उठणे, आळशीपणा आणि सढळ हात.

मी : तुम्ही तुमच्या मागण्यांसाठी रस्त्यावर येत नाही. रस्त्यावर येणे तुमच्या विचारात बसत नाही. तरीसुद्धा तुम्ही स्त्रीजागृतीचे मोलाचे कार्य करता. मी तुम्हाला 'रस्त्यावर न येणारी मिनी ( छोटी ) मृणाल गोरे' म्हटले तर चालेल काय ?

शैला : अजिबात चालणार नाही ! मला माझे स्वतंत्र अस्तित्व ( Identity ) आहे. मला शैला सुळेच म्हणा! कामाचा गौरव करा अगर न करा. अशी तुलना मला आवडत नाही.

मी : तुमच्या कामात मुंबईच्या सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील स्त्रियांनी साथ दिली का ? त्यांची मदत झाली की अडचण?

शैला : ह्या साऱ्यांचे दृष्टिकोन आणि माझा दृष्टिकोन यात फरक आहे. मी काहीही स्वार्थासाठी करीत नाही. मला काही स्त्रियांनी मदत केली; पण मी केलेल्या कामाचे श्रेय उपटण्याची वृत्तीच प्रामुख्याने दिसून आली. मी त्यांच्यावर अवलंबून नाही. माझ्या कार्यामुळे आकृष्ट झालेल्या माझ्या कार्यकर्त्या मैत्रिणी व समाजवादी कार्यकर्ते हेच माझे बळ आहे.


**हुकूमशहा सत्तेवर कसे येतात ?**
**राष्ट्रवादाची शुभशक्ती अशुभ केव्हा ठरते ?**

**या व अशा प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी....**

# नाझी भस्मासुराचा उदयास्त

**लेखक : वि. ग. कानिटकर**
**आवृत्ती : तिसरी (सचित्र)**
**किमत : रुपये पंचेचाळीस**

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे यांचा प्रभावी ग्रंथबोध

## डॉ. भीमराव कुलकर्णी

राष्ट्रवाद आणि प्रवृत्तिधर्म जोपासण्यासाठी निःस्वार्थपणे आपली लेखणी आणि वाणी झिजवणारे डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे हे एक थोर शिक्षक विचारवंत आहेत. विज्ञानप्रणीत समाजरचनेपासून इहवादी शासनापर्यंत त्यांचे अनेक ग्रंथ याची साक्ष देत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांसमक्ष दिलेल्या शेकडो व्याख्यानांचा, व्याख्यानमालांचा 'आधुनिक राष्ट्रधर्म' हाच एकमेव विषय असे. सेवानिवृत्त झाल्यावरही त्यांची लेखणी दुसऱ्या कुठल्या विषयाकडे न वळता याच विषयाकडे वळावी व एक विस्तृत कालखंड घेऊन, सामाजिक-सांस्कृतिक घटनांच्या सर्व अंगोपांगांना स्पर्श करून त्यांनी शेवटी सार म्हणून प्रवृत्तिधर्माचेच श्रेष्ठत्व सांगणारा 'महाराष्ट्र संस्कृती' हा ग्रंथ वाचकांसमोर ठेवावा, हे त्यामुळेच स्वाभाविक व आजवरच्या त्यांच्या चिंतनाशी, प्रतिपादनाशी सुसंगत वाटते. आजवरच्या त्यांच्या व्यासंगाची ही जणू एक परिणतीच आहे. प्रकृती साथ देत नसताना हा डेमी आकाराचा ८३५ पृष्ठांचा प्रचंड ग्रंथ त्यांनी एकहाती सिद्ध करावा, कॉंटिनेंटल प्रकाशनसंस्थेने कागदटंचाईच्या व महागाईच्या काळात तो प्रसिद्ध करून आपले आचार्यऋण फेडावे हा योगायोग सध्याच्या काळात दुर्मिळ झालेला आहे. मराठी वाचकांच्या भाग्याने हा योग या ग्रंथाच्या बाबतीत जमून आलेला आहे. लेखकाचे तर हवेच, पण प्रकाशकाचेही याबद्दल अभिनंदन होणे जरूर आहे.

**महाराष्ट्र संस्कृती :** या ग्रंथात तीन भागांत डॉक्टरांनी मराठी संस्कृतीचे चित्र रेखाटले आहे. (१) सातवाहन ते यादवकाल, (२) बहामनी व मराठाकाल आणि (३) ब्रिटिशकाल असे त्यांनी या ग्रंथाचे तीन भाग केले असून प्रत्येक भागामध्ये त्यांनी त्या त्या कालखंडातील राजकीय घडामोडींकडे, विस्ताराने विवेचन करण्याकडे अधिक लक्ष पुरविले आहे. त्याखालोखाल त्यांनी धर्म, अर्थ आणि समाज या घटकांकडे लक्ष पुरविले आहे आणि त्यामानाने कला व साहित्यविषयक अंगांकडे त्यांनी सर्वांत कमी लक्ष पुरविले आहे. एका अर्थाने डॉक्टरसाहेबांच्या हयातभरच्या चिंतनाला, अभ्यासाचा आणि त्यांच्या आवडीच्या हव्यासाचा हा ग्रंथ म्हणजे परिपाक असून वरील तीन भागांकडे त्यांनी ज्या पद्धतीने लक्ष दिले आहे, ती पाहता त्यांच्या एकंदर वैचारिक दृष्टिकोणाचेच ते प्रत्यंतर आहे, असे म्हटले पाहिजे.

### भाषातत्त्व ही पृथगात्मता

साधारणत: महाराष्ट्राचा ज्ञात सांस्कृतिक इतिहास, खरे पाहिले तर, यादवकालापासूनच काही प्रमाणात शोधता येतो; परंतु प्राच्यविद्याविशारदांनी उत्खनने, ताम्रपट व शिलालेख यांच्या सहाय्याने प्राचीन ग्रंथांच्या अंतरंगात शिरून आणि प्राचीन काळच्या राजेरजवाड्यांच्या प्राप्त झालेल्या नाण्यांच्या आधाराने दहाव्या-अकराव्या शतकाच्या मागे जाण्यात खूपच यश मिळविले आहे. विशेषत: महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागांत गेल्या काही वर्षांत झालेल्या उत्खननाने संशोधकांना जे काही महत्त्वाचे अवशेष मिळाले त्यांची 'कार्बन १४' ही कसोटी लावून कित्येक सहस्रकांपूर्वी महाराष्ट्रात वसाहत होती असे सांगितले आहे. काहींच्या मते तर ती कित्येक लाख वर्षांच्या घरात जाते. डॉ. सहस्रबुद्धे यांनी या बाबतीत इ. स. पूर्व १००० या काळापर्यंत महाराष्ट्रातील संस्कृतिधारा त्या युगातील भारतील धारांहून भिन्न नव्हत्या, हे उत्खननशास्त्राद्वारे मांडले गेलेले मत स्वीकारून त्यानंतरच्या काळात महाराष्ट्राला प्राप्त झालेली पृथगात्मता भाषातत्त्वाच्या आधारे गृहीत धरून विवेचन केले आहे.

सबंध हिंदुस्थानच्या प्राकृत भाषांमध्ये सर्वांत महत्त्वाची म्हणून मान्यता पावलेली 'महाराष्ट्री' ही प्राचीन काळची महाराष्ट्रभाषा, प्राचीन आणि मध्ययुगीन यांच्या संधिकाळात ती महाराष्ट्री-अपभ्रंश या नावाने ओळखिली जात होती आणि मध्ययुगीन काळात तिला मराठी हे अभिधान प्राप्त झाले, असा डॉ. सहस्रबुद्धयांच्या विवेचनाचा थोडक्यात मथितार्थ म्हणून सांगता येईल. अर्थातच हे सारे विवेचन अत्यंत वादग्रस्त आहे, हे मुद्दाम येथे सांगायला नकोच. भारतामध्ये एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आलेल्या प्राच्यविद्याविशारदांनी (Indologists) या बाबतीत जी मते मांडली आहेत त्यांचे संकलन केल्यानंतर या वादग्रस्त विषयाबद्दल या ठिकाणी डॉक्टरसाहेब ठामपणे मत मांडताहेत हे येथे लक्षात येते. अर्थातच 'अगदी अलीकडच्या' भाषाशास्त्रज्ञांची मते म्हणून त्यांनी जो उल्लेख केला आहे तो १९३६ चा आहे. त्यानंतरच्या भाषाशास्त्रज्ञांच्या विवेचनाचा उल्लेख ते करीत नाहीत. यासंबंधाने अलीकडे प्र. रा. देशमुख यांनी लेखरूपाने व ग्रंथरूपाने जे विवेचन केले आहे, ते खरे म्हणजे आधुनिक दृष्टिकोनाचे महत्त्वाचे प्रत्यंतर आहे. डॉक्टरसाहेबांनी आता त्यांच्या विवेचनाची दखल घेतलेली दिसत नाही.

प्राकृत भाषेसंबंधाच्या विवेचनात डॉ. सहस्रबुद्धे यांनी या क्षेत्रातील काही निवडक आणि तेही जुन्या अभ्यासकांच्या मतांच्या संकलनाचे जे धोरण ठेविलेले आहे, तेच त्यांनी अनेक ठिकाणी कायम ठेविले आहे. या संकलनाच्या पार्श्वभूमीवर केलेले विवेचन मात्र खास त्यांचे आहे. या बाबतीतले प्रस्तावनेतले त्यांचे निवेदन खालीलप्रमाणे आहे :

"धर्म, राजकारण, समाजरचना, अर्थकारण, विज्ञान, कला,

साहित्य व शिक्षण अशी संस्कृतीची आठ प्रधान अंगे आहेत. प्रत्येक कालखंडातील या आठही अंगांचे विवेचन उपलब्ध माहितीच्या आधारे केलेले आहे.

"लो. टिळक, डॉ. भांडारकर, म. म. मिराशी, डॉ. आळतेकर, चिं. वि. वैद्य, डॉ. केतकर, वि. का. राजवाडे, गो. स. सरदेसाई, डॉ. शं. रा. पेंडसे, डॉ. काणे, डॅा. धनंजय गाडगीळ, श्री. जावडेकर, सेतुमाधवराव पगडी, डॉ. मुनशी, डॅा. गोपलाचारी, नीळकंठशास्त्री, डॉ. सेन, यदुनाथ सरकार, रमेशचंद्र मुजुमदार, काशीप्रसाद जयस्वाल, कृष्णस्वामी अयंगार यांसारख्या विख्यात पंडितांच्या ग्रंथांच्या आधारे हे सर्व विवेचन केलेले आहे; पण मते आणि दृष्टिकोण सर्वस्वी माझा आहे. त्यामुळे ग्रंथातील गुणदोषांची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे."

डॉ. सहस्रबुद्धे यांच्या व्यासंगाचे सामर्थ्य आणि त्यांची दृष्टी या दोन्ही गोष्टी या निवेदनावरूनच लक्षात येतात. या विषयातील अभ्यासकांचे क्षेत्र याहून खूप मोठे आहे. अशा प्रकारच्या व्यापक विषयावर लिहीत असता अनेकांच्या अभ्यासाचा उपयोग करून घ्यावा लागतो, परंतु केवळ काही निवाडयांवर अवलंबून राहिल्याने आपल्या विवेचनावर खूपच मर्यादा पडतात. अशा प्रकारच्या अभ्यासात निर्णायक आणि निश्चित भूमिका घेता येत नाही; परंतु तशी निश्चित, ठाम भूमिका घेऊन येणाऱ्या दोघांची जबाबदारी स्वीकारून लेखन करणे हा डॉक्टरसाहेबांच्या प्रकृतीचा धर्म आहे. डॉक्टरांची ही लेखनप्रकृती संशोधकाची नसून आग्रही विचारवंताची आहे, हे या ग्रंथामध्ये सर्वत्र जाणवते.

महाराष्ट्री प्राकृत म्हणजे जणू काही मराठीच आणि जेथे जेथे ती दिसते तो महाराष्ट्र या कल्पनेने डॉ. सहस्रबुद्धे यांनी अनेक नामवंत राजघराण्यांना महाराष्ट्रीय ठरविले आहे. त्यामुळे आपली प्रादेशिक अस्मिता गोंजारली जाऊन क्षणभर बरे वाटते; परंतु आपले संशोधकाचे मन जर सलग असेल तर ही अस्मिता फार काळ टिकू शकत नाही. सातवाहन, राष्ट्रकूट, चालुक्य, (बदामी आणि कल्याणीचे दोन्ही) आणि यादव ही सारी प्राचीन भारतातील राजघराणी महाराष्ट्रीयच आहेत, याबद्दल डॉक्टरांनी निःशंक विवेचन केले आहे.

कोणताही राजवंश मुळात कुठला, कुठून आला, त्यांचे प्राचीन वंशज कोणत्या वर्णाचे होत आणि त्यांची मातृभाषा काय होती, यासबंधी इतिहासकार जी चर्चा करतात ती सहस्रबुद्ध्यांना बऱ्हंशी निष्कळ वाटते. त्यांनी ग्रंथाच्या पृ. ७५ वर व पुन्हा पृष्ठ ८० वर त्याची पुनरावृत्ती करून त्यांचे निकष सांगितले आहेत. "कोणताही समाज व कोणतही राजघराणे कर्मभूमी कोणती मानते, स्वकीय कोणाला समजते, समरस कोणाशी होते, कोणत्या समाजाच्या साहाय्याने पराक्रम करते, कोणत्या भूमीला स्वराज्य मानते यावर त्याचे राष्ट्रीयत्व ठरत असते" या कसोटीवर सहस्रबुद्ध्यांनी वरील सारी राजघराणी निश्चितपणे महाराष्ट्रीयच होती असे निःसंदिग्धपणाने सांगून टाकले आहे. प्रस्तावनेत, "विशेषतः सातवाहन ते यादव ही सर्व घराणी महाराष्ट्रीय राजघराणी होती की नाही या अत्यंत वादग्रस्त विषयाचे प्रदीर्घ विवेचन करून, त्याविषयी निघणाऱ्या सर्व आक्षेपांना उत्तर देऊन ही सर्व घराणी महाराष्ट्रीयच होती असा सिद्धान्त मी मांडला आहे. वाचकांनी त्याकडे बारकाईने लक्ष द्यावे." अशी विनंती केली आहे. सातवाहन, वाकाटक आणि यादव यांच्या महाराष्ट्रीयत्वाबद्दल संशोधकांत बरीचशी अनुकूलता आहे. परंतु चालुक्य आणि राष्ट्रकूट यांच्याबद्दल तसे म्हणता येणार नाही. चालुक्य तर निश्चितपणाने कर्नाटकी आहेत आणि राष्ट्रकूट बाहेरचे आहेत. म्हणूनच राजवाडे यांनी त्यांना महाराष्ट्रावर राज्य करणारे परकीय राज्यकर्ते म्हटले आहे; परंतु सहस्रबुद्ध्यांनी त्यांचा उपहास केला आहे. शं. बा. जोशी यांनी व्युत्पत्तीच्या आधारे प्राचीन महाराष्ट्राबद्दल जी अभिनव उपपत्ती मांडली आहे, ती तर चांगलीच विचार करण्यासारखी आहे; परंतु त्याचाही उपहास करण्यात आला आहे.

वास्तविक डॉक्टरांनी निर्माण केल्या आहेत, त्याप्रमाणे काही कसोट्या निर्माण करून त्यांच्या आधाराने सोडविण्याचा हा प्रश्न नव्हे. हा प्रांत त्या क्षेत्रातील संशोधकांचा आहे. याबाबतीत अनेक संशोधकांनी त्या संबंधाने नव्या नव्या साधनांचा शोध घेऊन त्यावरून आपले विचार मांडले आहेत; परंतु सहस्रबुद्ध्यांप्रमाणे ठामपणा कोठेच स्वीकारलेला नाही. अगदी साधे सातवाहनांचेच उदाहरण घ्या ना! सारी पुराणे सातवाहनांना आंध्र ठरवितात आणि पुराणांना असे सहजासहजी डावलता येणार नाही, याची कल्पना असल्याने नवीन साधनांच्या साहाय्याने ते आंध्र नसावेत, महाराष्ट्रीय असावेत अशा विध्यर्थी निर्णयापर्यंत संशोधक येतात. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या 'आद्यमहाराष्ट्र आणि सातवाहनकाल' या ग्रंथात प्रसिद्ध संशोधक र. म. भुसारी यांनी सातवाहन हे महाराष्ट्रीय होत, असा निर्णय दिला, तरी त्यासंबंधाने संशोधकांनी जी चर्चा केली आहे, यातून या प्रश्नाचे स्वरूप अत्यंत जटिल आणि कूट असल्याचे वारंवार स्पष्ट केले आहे. तेव्हा सहस्रबुद्ध्यांनी म्हटले म्हणून ही घराणी महाराष्ट्रीय होऊ शकणार नाहीत, याचे भान ठेविले पाहिजे. महाराष्ट्र, आंध्र आणि कर्नाटक या तिन्ही भूप्रदेशांवर राज्य करणारी ही जी अनेक राजघराणी आहेत, त्यांच्यावर एकालाच कुणाला निर्णायक हक्क सांगता येणार नाही, ही वस्तुस्थिती आहे.

## उज्ज्वल कालखंड

इसवी सनाच्या दहाव्या–अकराव्या शतकापासून भारतीय संस्कृतीच्या ऱ्हासकाळाला सुरुवात होते. या ऱ्हासकाळाचे अत्यंत परिणामकारक चित्रण हा डॉक्टरसाहेबांच्या लेखनाचा सर्वज्ञात विशेष. वास्तविक भारतीय संस्कृतीच्या अधःपतनाचे चित्र रेखाटताना यापूर्वी ते प्राचीन भारतीय संस्कृती आणि मध्ययुगीन भारतीय संस्कृती असा भेद लक्षात घेत नसत; परंतु आयुष्याच्या उत्तर काळात डॉक्टरसाहेबांना या विषयाचा अभ्यास करताना अभ्यासकांच्या गेल्या काही वर्षातील नव्या संशोधनाची जोड मिळाल्याने प्राचीन भारतीय संस्कृतीचे त्यांनी रेखाटलेले चित्र आता वेगळे दिसू लागले आहे. डॉ. यजदानी यांनी संपादित केलेल्या 'अर्ली हिस्टरी ऑफ द डेक्कन' या ग्रंथातील विद्वानांच्या लेखांमुळे डॉ.सहस्रबुद्ध्यांना सातवाहनाच्या राजवटीतील महाराष्ट्राचे एक उज्ज्वल चित्र रेखाटता आले आहे. 'एक थोर संस्कृती' या शब्दात या काळाचा त्यांनी केलेला गौरव पाहून एकदम बरे वाटते. प्राचीन भारतातील स्वायत्तसंस्था, लोकसंस्था, अर्थकारण आणि राजकारण यासंबंधात अनेक भारतीय

पंडितांनी गेल्या पन्नास–पाऊणशे वर्षांत जी साधनसामग्री उपलब्ध करून दिली आहे आणि त्याच्या आधारे जे विवेचन केले आहे, त्यावरून डॉ. सहस्रबुद्धे यांनीही हा कालखंड वैभवाचा, उत्कर्षाचा, विक्रमाचा, स्वातंत्र्याचा, पुरुषार्थाचा व कर्तृत्वाचा असल्याचे मान्य करावे, याचा आनंद होतो. मात्र इ. स. पूर्व २३० पासून इ. स. च्या तेराव्या शतकापर्यंत सहस्रबुद्धे म्हणतात, त्याप्रमाणे इतक्या मोठ-मोठ्या महाराष्ट्रीय घराण्यांनी महाराष्ट्रावर राज्य केले त्यामध्ये पुळुमावी ( पुलुमायी नव्हे ), पुळुकेशी ( नावेच तेलुगु वाटत नाहीत का ? ) यांसारखे पराक्रमी सम्राट होऊन गेले असता एवढ्या मोठ्या कालखंडातील वाङमय, विद्या व कला यांचे चित्र कसे मोठे मनोरम दिसले पाहिजे, तसे कुठलेच चित्र सहस्रबुद्ध्यांनी उभे का करू नये?

जैन कवींनी लिहिलेली काही प्राकृत काव्ये, हाला सतासईसारखा एखादाच महत्त्वाचा प्राकृत ग्रंथ एवढीच काय ती या काळातील कमाई ! बदामीच्या चालुक्यांची भाषा कानडी असताना त्यांना महाराष्ट्रीय का म्हणावे, यासंबंधी प्रशियाचा महाराणा फ्रेडरिक याचे उदाहरण देताना डॉक्टरांनी सुरुवातीला भाषाभेद हे पृथगात्म अस्मितेचे महत्त्वाचे तत्त्व असल्याचे जे प्रतिपादन केले आहे, त्याचे विस्मरण का व्हावे ? विजयनगरच्या राज्यकर्त्यांची भाषा ही कानडी होती. वास्तविक त्यांनाही याच न्यायाने महाराष्ट्रीय म्हणता आले असते, नाही का ?

## अधःपाताची मीमांसा

इसवी सनाच्या आठव्या–नवव्या शतकापासूनच भारतीय समाजाच्या अधःपतनाला सुरुवात झाली. राजकीयदृष्ट्या या काळातील महाराष्ट्रातील राज्यकर्ते सातवाहनांच्या तुलनेने दुबळे ठरू लागले आणि सामाजिकदृष्ट्या साऱ्या भारतात ज्या धार्मिक लाटा उसळल्या त्याचा परिणाम म्हणून समाजातील प्रवृत्तिवादाची पीछेहाट होत गेली, असे डॉक्टरांना वाटते. ८ व्या शतकानंतरच्या भारतातील धार्मिक जीवनाचे विश्लेषण करताना डॉक्टरांनी या काळातील भारतीय संस्कृतीच्या पीछेहाटीची मीमांसा आपल्या ओघवत्या शैलीत करण्याचा प्रयत्न केला आहे. बौद्ध आणि जैन यांच्या निवृत्तिवादामुळे आणि त्यांच्या आत्यंतिक अहिंसेच्या विचारामुळे भारतीय संस्कृतीची अतिशय हानी झाली, हे पंडितांचे सर्वमान्य मत डॉक्टरांना मान्य नाही. त्यांच्या मते, शंकराचार्यांचा संन्यासवाद, कुमारिलभट्टाचा अदृष्टवाद, त्याची समन्वय पद्धती व त्याने स्वीकारलेले शब्द प्रामाण्याचे तत्त्व आणि इ. स. १००० ते १२०० च्या सुमारास निर्माण झालेला 'कलिवर्ज्य' नामक धर्मपर निबंध आणि पुराणांनी विवेचिलेल्या भक्तिमार्गाला आलेले जड कर्मकांडाचे स्वरूप अशा प्रकारची सुमारे चार प्रमुख कारणे भारतीय संस्कृतीच्या अधःपतनास जबाबदार आहेत. या चार कारणांपैकी पहिल्या तीन कारणांसंबंधी लिहिताना डॉक्टर सात्त्विक संतापामुळे आवेशपूर्ण भाषाशैलीचा अवलंब करतात. शंकराचार्यांनी आकर ग्रंथांवर किंवा प्रस्थानत्रयीवर जी भाष्ये लिहिली, त्यांचे महत्त्व उपहासपर अशा एका वाक्याने डॉक्टर साफ धुळीस मिळवितात. डॉ. काणे, कन्हैयालाल मुन्शी यांच्या ग्रंथांतील एतद्विषयक विचारांची अवतरणे देऊन डॉक्टरांनी या आपल्या आवडत्या भूमिकेचे अत्यंत परिणामकारी विवेचन केले आहे. या धार्मिक जीवनातील अधोगतीचे परिणाम या काळीतील भारतीय समाजावर कसे झाले हेही डॉक्टरांनी त्याच प्रक्षुब्ध शैलीत सांगितले आहे. भारतीय संस्कृतीतील स्त्रीच्या वाट्याला आलेले गौणत्व आणि दास्य यासंबंधीचे या भागातले विवेचन महत्त्वाचे आहे.

यादवपूर्व काळातील संस्कृतीचे डॉक्टरांनी या ठिकाणी रेखाटलेले चित्र हे वस्तुतः महाराष्ट्राचे नसून ते साऱ्या भारताचे आहे. डॉक्टरांनाही त्याची कल्पना आहे. वास्तविक यादवकाळातील उपलब्ध मराठी ग्रंथांत या काळाचे जे प्रतिबिंब पडले आहे, त्याच्या साहाय्याने हे चित्र अधिक परिणामकारक करता आले असते आणि त्यामुळे मराठी संस्कृतीचे चित्र उभे राहण्यास मदत झाली असती.

यादवकाळापर्यंतच्या महाराष्ट्रातील सामाजिक, धार्मिक व आर्थिक परिस्थितीच्या विवेचनाच्या तुलनेने या काळातील 'साहित्य, कला व विद्या' यांच्याबद्दलचे त्यांनी केलेले विवेचन अतिशय त्रोटक, तुटपुंजे व कसेबसे चटावर उरकल्यासारखे झाले आहे. या काळातील 'ज्ञानेश्वरी' व 'लीळाचरित्र' या महत्त्वाच्या ग्रंथांचा उल्लेख डॉक्टर केवळ नाममात्र करतात. महानुभावांच्याही काही ग्रंथांचा असाच उगीच धावता उल्लेख करतात. त्यातील 'ज्ञानप्रबोध' या ग्रंथाचा उल्लेख तर अगदी चुकीचा आहे. हा ग्रंथ १४ व्या शतकातला आहे.

## शास्त्री-पंडित-सरदार

दुसऱ्या भागातील 'बहामनी व मराठाकाल' यासंबंधीच्या विवेचनात मराठाकालाला प्राधान्य मिळावे, हे साहजिकच आहे; या भागात बहामनी काळासंबंधाने केवळ राजकीयदृष्ट्या आणि धार्मिकदृष्ट्या विवेचन आहे. बाहेरून उपऱ्या म्हणून आलेल्या मुसलमानांनी दक्षिणेत अनेक राज्ये स्थापावी आणि या भागातील पराक्रमी मराठा सरदारांनी त्यांची चाकरी करण्यात केवळ समाधान मानावे याचा अर्थच आपणास कळत नाही, असे उद्वेगजनक उद्गार येथे डॉक्टरांनी वारंवार काढले आहेत. त्यामागील डॉक्टरांच्या मनातील व्यथा येथे खूपच बोलकी झाली आहे. मुसलमान राज्यकर्त्यांचा विलक्षण लहरीपणा, त्यांची क्रूरता आणि असहिष्णुता, त्यांचे आपापसातील हेवेदावे पाहता ते इतका काळ या देशात राहूच कसे शकले, असा डॉक्टरांना प्रश्न पडतो. बहामनी-काळातील महाराष्ट्राचे दुसरे नेते म्हणजे शास्त्रीपंडित. मराठा सरदारांच्या निर्भर्त्सनेनंतर त्यांची पाळी येते ! इथे म. म. काण्यांच्या धर्मशास्त्रविषयक विचारांच्या साहाय्याने डॉक्टरांनी या काळातील शास्त्रीपंडितांवर उपहासाची अगदी करडी धार धरली आहे. तीर्थयात्रा, व्रतवैकल्ये यांचे स्तोम माजविणाऱ्या या काळातील नामांकित पंडितांनी प्रस्थापित केलेल्या धर्माची 'गाजर–मुळा-धर्म', चवळ्या–मसुरा-धर्म' या उपरोधपर शब्दात चांगली संभावना केली आहे. या काळातील धर्माला आलेल्या विकृतीच्या अनेक अंगांची ही चर्चा अतिशय उद्बोधक आहे. परंतु ऱ्हासकाळात स्त्रियांची केलेली मुस्कटदाबी आणि कर्मकांडाला आलेले महत्त्व यांच्या पाठीमागे डॉक्टरांनी सांगितली तेवढीच महत्त्वाची कारणे नसून, ती आणखी खोल आहेत. जैन आणि बौद्धधर्मीयांच्या अवैदिक संस्कृतींचा पाडाव

...ऊन वैदिक संस्कृतीच्या पुनरुज्जीवनाच्या प्रेरणेतून भारतीय समाने स्वच्छेने आचारविचारांच्या बाबतीत जे कडक निर्बंध स्वतःवर ...दून घेतले, त्याच्यामागची भूमिका कुठे तरी डॉक्टरांनी लक्षात ...ग आवश्यक होते. स्मृतिग्रंथांवर निबंध लिहिण्याच्या निमित्ताने ...णि उत्तरकालीन पुराणांच्या आधाराने उच्च वर्णीयांच्या आचारां... र अधिकाधिक बंधने का येत गेली असावीत, हे लक्षात घेतले नाही र या काळातील हिंदुधर्माच्या अधोगतीचे चित्र अपुरे राहते. डॉक्टर... हेबांच्या एतद्विषयक विवेचनाचे तसेच झाले आहे. इसवी सनाच्या ...ठव्या शतकानंतर आलेल्या हिंदुधर्मीयांच्या धार्मिक पुनरुज्जीव...चा हा परिणाम होय, हे डॉक्टरांना अगदी मान्य दिसत नाही. ... लाटेमुळे हिंदुधर्माची चातुर्वर्ण्यामध्ये विभागणी झाली आणि ...तिसंस्था प्रबळ झाल्या. या लाटेमुळे कर्मकांड प्रबळ झाले, हे जसे ...रे आहे, तसेच त्यामुळेच हिंदुधर्म तगून राहिला, हेही तितकेच ...रे आहे. हिंदुधर्म म्हणजे जातिसंस्था किंवा चातुर्वर्ण्य अशी जी ...क अभेद्य व्यवस्था या देशात निर्माण झाली, त्यामुळेच मुसलमानांना ...णि उत्तरकाळात पोर्तुगीजांना किंवा इंग्रजांच्या छुप्या आश्रया...ली हिंदुधर्म नेस्तनाबूत करावयास निघालेल्या प्रबळ अशा ख्रिस्ती ...शनऱ्यांना हिंदुधर्माचा पाडाव करता आला नाही, याची ग्वाही ...नेक पाश्चात्य विचारवंतांनी दिली आहे. जे गर्हणीय तेच ...से उपकारक ठरते, त्याचा हा पुरावा होय. किंकर्तव्यमूढ झाले...यांना या काळामध्ये या चातुर्वर्ण्यानेच तारले आहे, हे कसे विसरता ...ईल ? आठव्या-नवव्या शतकापूर्वी बौद्ध आणि जैनसंस्कृतीच्या ...क्रमणामुळे हिंदु समाजाला आलेली किंकर्तव्यमूढता हीही सहस्रबुद्धे ...ांगतात त्या वैभवकाळात देखील दिसून येते. भारतीय संस्कृतीच्या ...ाही अंगाकडे सहस्रबुद्धे यांनी पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे. अर्थातच दुबळे, ...ीण होऊन आपले सारे शरीर पाठीवरच्या शिंपल्यात लपविणाऱ्या ...ोगलगायीप्रमाणे हिंदु समाजाचे कित्येक शतकांचे दैन्यभराचे जिणे, ...े जिणेच कसले, असे डॉक्टरांप्रमाणे अनेकांना वाटावे हे साहजिकच आहे; पण सांस्कृतिक इतिहासामध्ये संस्कृतीच्या अधोगतीचे चित्र रंगविताना त्याच्या सर्वांगीण विवेचनाची इतिहासकाराची दृष्टी असली पाहिजे, हेही नाकारता येत नाही.

## संतांचा अन्वयव्यतिरेक

दुसऱ्या विभागातील 'संतांचे कार्य' आणि 'संतकार्य-चिकित्सा' या दोन प्रकरणांतून नेहमीचे डॉक्टर दिसतात. मध्ययुगीन मराठी संस्कृतीचा 'संतवाङ्मय' हा एक अत्यंत मौलिक ठेवा आहे; परंतु डॉक्टरांना तसे वाटत नाही, हे आमचे दुर्दैव आहे ! संतांच्या कार्याची काही अंगे त्यांनी आपल्या अभ्यासाच्या पद्धतीप्रमाणे, काही मुद्दे पाडून त्यांच्या सहाय्याने विवेचिलेली आहेत. या साऱ्या विवेचनात फारसा जीव नाही. एक समर्थ रामदास सोडले तर बाकी कुठल्याच संताने डॉक्टरांचे मन आकर्षून घेतले नाही. 'संतकार्य-चिकित्सा' या प्रकरणामध्ये पूर्वीच्या प्रकरणात संयपणे विवेचन करणारे डॉक्टर उसळून येतात आणि त्यांची वाघनखे बाहेर येतात. 'संतांचे कार्य हे निःसंशय मोठे आहे आणि यासाठी महाराष्ट्र त्यांचा कायमचा ऋणी राहील.' असे एखादे निर्जीव वाक्य उगीचच मध्ये टाकून, संत प्रवृत्तिवादी होते, म्हणणाऱ्यांचा ते उफाळून समाचार घेतात. संतांनी संसाराकडे केलेले दुर्लक्ष आणि त्यांची स्त्रीनिंदा, राजधर्म, बळसामर्थ्य यांची त्यांनी केलेली उपेक्षा, ढेकणाची बाज म्हणून ऐहिक सुखाची त्यांनी केलेली लाथाडणूक इत्यादी बाबींचा उल्लेख करून संत प्रवृत्तीमार्गी होते म्हणजे काय हे आपल्याला कळत नाही, असे ते पुन्हा आपल्या ठेवणीतल्या उद्वेगानेच म्हणतात. डॉ. शं. दा. पेंडसे यांच्यासारख्या त्यांना मान्य असलेल्या अभ्यासकाने संतांना प्रवृत्तिमार्गी ठरवावे, याचे डॉक्टरसाहेबांना झालेले दुःख कमालीचे आहे ! प्रवृत्तिमार्ग, ऐहिक उत्कर्ष यांच्याबद्दलच्या ठाम कल्पना या ठिकाणी डॉक्टरांनी व्यक्त केल्या आहेत; परंतु शं. दा. पेंडसे कोणत्या अर्थाने संतांना याबाबतीत महत्त्व देतात, हे लक्षात न घेता आजच्या पाश्चात्यप्रणीत ऐहिक उत्कर्षाच्या कल्पनांचा उद्‌घोष करून डॉक्टरांनी संतांना महत्त्वाचे श्रेय नाकारले आहे. अध्यात्मामध्ये ज्या प्रकारे अनेक अंतर्विरोधाची संगती लावावी लागते, ती लावण्याचे भारतीय तर्कशास्त्राचे आणि मीमांसाशास्त्राचे काही दंडक आहेत. निर्गुण, निराकार अशा चिंततत्त्वाची उपासना करणारे संत दुसरीकडे सगुणसाकाराला कवटाळताना दिसतात. त्यामध्ये विसंगती नाही काय ? त्याचप्रमाणे व्यतिरेकाने संसारासंबंधी निरनिराळ्या प्रकारच्या कल्पना मांडणाऱ्या संतांनी अन्वयपद्धतीने कोणती जीवनदृष्टी दिली आहे, हे लक्षात घ्यावे लागते. डॉ. पेंडसे यांचा भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास सूक्ष्म असल्याने त्यांनी आत्मिक दृष्टीने संतांच्या कार्याचे हे मर्म विशद केले आहे. संत राजकारणी नव्हते, समाजशास्त्रज्ञ नव्हते, शास्त्रज्ञ नव्हते आणि शासकही नव्हते. ते लोकोद्धाराच्या तळमळीने लोकशिक्षणाचे महत्त्वाचे कार्य करीत होते. त्यांच्या कार्यातूनच महाराष्ट्राच्या पृथगात्म अस्मितेचा उत्कट असा साक्षात्कार होतो आणि इह आणि पर यांच्यातल्या नेमक्या संबंधाची ग्वाही मिळते.

गीतेचा संन्यासपर अर्थ लावून मायावादाचा आणि निवर्तवादाचा पुरस्कार करणाऱ्या शंकराचार्यांसारख्या एका असाधारण ताकदीच्या तत्त्वज्ञान्याचा तात्त्विक दृष्टीने पाठपुरावा करून ऐहिक दृष्टीने या जगतातील जगण्याला सत्य आणि सुंदर म्हणणाऱ्या ज्ञानेश्वरांना आणि त्यांचा पाठपुरावा करणाऱ्या महत्त्वाच्या संतांना आपल्या ऐहिक आणि पारमार्थिक कल्याणाची चिंता होती, असे म्हणू नये तर काय म्हणावे ? डॉ. सहस्रबुद्धयांच्या ऐहिक उत्कर्षाच्या कल्पना आणि संतांच्या व भारतीय समाजाच्या त्याबद्दलच्या कल्पना यांच्यामध्येच मुळी अंतर आहे. डॉक्टरांनी आत्मिक दृष्टीने पाहिले नाही तर त्यांच्या भूमिकेत परिवर्तन होणे कालत्रयीही शक्य नाही, हे या ठिकाणी जाणवते. समर्थांनीही निवृत्तिपर खूप लिहिले आहे आणि भागवतधर्मीय संतांप्रमाणे त्यांनीही खूप संसारनिंदा केली आहे, या विसंगतीचा परिहार करण्याचा प्रयत्न डॉक्टरसाहेब करतात; परंतु तोच न्याय ते भागवतधर्मीय संतांना लावू इच्छित नाहीत. पेंडशांनी ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम व रामदास या चारही संतांवर पुस्तके लिहिली आहेत. त्यांपैकी रामदासांबद्दलचे विवेचनच तेवढे डॉक्टरसाहेबांना ग्राह्य वाटते ! ऐतिहासिक दृष्टीच्या सम्यक आलोचकाची भूमिका डॉक्टरांची नाही, हे येथे प्रकर्षाने जाणवते.

## नाथांचे कार्य

महाराष्ट्रधर्माचे सारे श्रेय डॉक्टर संतमंडळींपैकी केवळ समर्थांना





देतात याचे अतिशय आश्चर्य वाटते. या धर्माचे आद्य पुरस्कर्ते ज्ञानदेव आहेत आणि नाथांच्या वाङमयात याचे अत्यंत सखोल दर्शन घडते. किंबहुना दासबोधातील यासंबंधाच्या साऱ्या विवेचनाचे स्फूर्तिस्थान म्हणजे एकनाथ आहेत, याबद्दल आता अभ्यासकांमध्ये कसलाही संदेह उरला नाही.

राहून राहून एक विचार सारखा मनात येतो की, ज्ञानदेवांबद्दल डॉक्टरांचे मन इतके कोरडे कसे? पहिल्या भागामध्ये जेथे ज्ञानदेवांच्या कार्याचे विवेचन यावयास हवे होते, तेथे 'संतांचे कार्य' प्रकरणात ते पुढे येईल म्हणून ते टोलवतात आणि प्रत्यक्ष या प्रकरणात ज्ञानेश्वरीतील चार-दोन जुजबी अवतरणे देऊन ते ज्ञानेश्वरांना सफाईने डावलतात! मराठीवाङ्मयातला ज्ञानेश्वरी हा एक अलौकिक ग्रंथ आणि या ग्रंथाद्वारे ज्ञानदेवांनी केलेले कार्यही तितकेच असाधारण, पण डॉक्टरसाहेबांच्या लेखी त्याला हे स्वरूप यावे याचे आश्चर्य वाटते. वास्तविक समर्थांप्रमाणेच ज्ञानदेव, एकनाथ यांना स्वतंत्र प्रकरणे हवी होती! याबाबतीत डॉक्टर मुळीच बदलले नाहीत, इतकेच येथे म्हणता येते.

आश्चर्य आणखी बऱ्याच गोष्टींचे वाटते. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे भारतीय संस्कृतीचे विचारमंथन करणारे प्रसिद्ध ग्रंथ आहेत; परंतु एकदा मुकुंदराजांबद्दलच्या त्यांच्या मताचा उल्लेख सोडला तर डॉक्टरांनी त्यांच्या ग्रंथांची कुठेच दखल आपल्या विवेचनात घेतलेली नाही. याउलट रियासतकार सरदेसाई यांच्या ऐतिहासिक ग्रंथांवर डॉक्टरांनी अगदी अतिरिक्त भर दिलेला दिसून येतो. रियासतकारांवर डॉक्टरांची एक प्रकारची भक्ती आहे हे लक्षात येते. रियासतकारांचा इतिहासलेखनाचा उद्योग प्रचंड आहे, हे खरे आहे; परंतु त्यात सर्व प्रकारच्या साधनांचा तारतम्य न ठेवता सर्रास उपयोग केल्याने त्याची विश्वसनीयता आणि प्रामाण्य फार कमी आहे. बखरीतील दंतकथांचा इतकेच नव्हे तर ऐतिहासिक कादंबऱ्यांतील काल्पनिक माहितीचाही ते आपल्या इतिहासलेखनात समावेश करतात, हे डॉक्टरांना माहीत नाही असे कसे होईल? या अतिरिक्त विसंबण्यामुळे डॉक्टरांच्या पेशवेकाळासंबंधीच्या विवेचनाला विशेष श्रेणी प्राप्त होत नाही असे खेदाने म्हणावेसे वाटते.

या ग्रंथातील सगळ्यात दुबळा भाग म्हणजे तिसऱ्या विभागातील मराठी साहित्य, कला, विज्ञान, अर्थकारण यासंबंधी डॉक्टरांनी केलेले विवेचन. हा सर्वच भाग कसा तरी पुरा केलेला आहे. विज्ञानविषयक आणि अर्थशास्त्रविषयक एखाद-दुसऱ्या ग्रंथातील माहितीचे नीरस संकलन आणि अधूनमधून एखाददुसऱ्या वाक्यातून डॉक्टरांनी केलेली टीकाटिप्पणी यांनी हा विभाग सिद्ध झाला आहे. डॉक्टरांचे मराठी वाङमयाच्या आस्वादाचे विश्व माटचांपर्यंतचे मराठीतील निबंधकार, केशवसुत व हरिभाऊ आपटे यांच्या पलीकडे फारसे जात नाही. वास्तविक डॉक्टरांनी १९४७ ही मर्यादा घालून घेतलेली असताना त्यानंतरच्या मराठी वाङमयाची कशी तरी (at random) जंत्री देण्याचे काय कारण? त्यामुळे अनेक प्रकारच्या विसंगतीने हे विवेचन भरलेले आहे. पुस्तकाचा हा भाग डॉक्टरांनी लिहिला नसता अगर आहे या स्वरूपात प्रसिद्ध केला नसता तर बरे झाले असते.

डॉक्टरांच्या लेखनाच्या आणखी एकदोन विशेषांचा येथे ओझरता उल्लेख केला आहे. प्राकृत भाषेच्या विवेचनात त्यांनी डॉ तुळपुळे

आणि डॉ. कोलते यांच्या भाषाशास्त्रीय मतांचा जो उल्लेख केला आहे, तो पाहून हे दोघे श्रेष्ठ भाषाशास्त्रज्ञ आहेत असे वाटावे. वास्तविक डॉ. कोलते हे महानुभाव-वाङमयाचे एक गाढे संशोधक व पंडित आणि डॉ. तुळपुळे हे गुरुदेव रानडे यांच्या संतवाङ्मयपर विचारांचे नेटके संकलन करणारे शैलीदार लेखक. त्यांच्या क्षेत्रातील त्यांच्या विवेचनाचा आधार घ्यावयाचा नाही आणि त्यांच्या दुय्यम अशा किरकोळ लेखनाचा मात्र वापर करावयाचा, हे काहीसे विलक्षण दिसते. शं. दा. पेंडसे आणि लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या बाबतीतही असेच घडले आहे.

आणखी एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे संस्कृतीच्या विवेचनात सगळ्यात महत्त्व त्या काळातील साहित्याला असते. त्या साहित्याच्या अंतरंगात शिरून त्यातून दिसणाऱ्या संस्कृतीचे प्रतिबिंब न्याहाळले पाहिजे. डॉक्टरांनी तसे न करता त्या त्या कालखंडातील साहित्याचा स्थूल व ओझरता आढावा कशाकरता घेतला आहे, ते कळत नाही. यादवकालीन, बहामनीकालीन, शिवकालीन, पेशवेकालीन व ब्रिटिशकालीन मराठी वाङ्मयाच्या अंतरंगात शिरून मराठी संस्कृतीचे विवेचन करण्याचे एक महत्त्वाचे क्षेत्र त्यामुळे अद्याप मोकळे राहिलेले आहे.

## सर्वोत्कृष्ट भाग

डॉक्टर सहस्रबुद्धे हे विचाराने लोकशाही राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते असले तरी मनाने ते खऱ्या अर्थाने वीरपूजकच आहेत. त्यामुळे महाराष्ट्र-संस्कृतीत त्यांना ज्या ज्या व्यक्तींमध्ये पराक्रमादी कर्तृत्वाचे आणि राष्ट्रउभारणीचे सामर्थ्य दिसले, त्या त्या व्यक्तींबद्दल लिहिताना त्यांच्या लेखणीला कौतुकाचा, संतोषाचा बहर येतो आणि या कर्तृत्वाचा जेथे अभाव दिसतो तेथे उपहासाचे शस्त्र परजतात आणि त्याची शक्य तितकी विटंबना करू पाहतात. उदा. गौतमीपुत्र सातकर्णीबद्दल लिहिताना ते म्हणतात की, 'ज्याचे यशोवर्णन करताना कवींना स्फूर्ती यावी, इतिहासकारांना अभिमान वाटावा व या भूमीला कृतज्ञतेने ज्याचे स्मरण व्हावे असा हा सम्राट होता! सातवाहनकुलातील हा सर्वश्रेष्ठ राजा होय. मुस्लिम आक्रमणापासून महाराष्ट्राला मुक्त करणाऱ्या श्रीशिवछत्रपतींचे नाव जितक्या आदराने व भक्तिभावनेने आपण घेतो तितक्याच आदराने व भक्तिभावनेने नाव घ्यावे असा हा महाराज...सातवाहनांचा सम्राट पुलुमायी चेही याच उच्चरवात वर्णन केले आहे. या उच्चरवाचे दिव्य अशा यशोगाथेत रूपांतर होते ते शिवप्रभूंच्या कर्तृत्वाची जयगाथा गाताना आणि सामर्थ्यांच्या प्रवृत्तिपर विचारांचे भव्य चित्र रेखाटताना! किंबहुना या ग्रंथातील सर्वांत लक्षणीय भाग म्हणजे स्वराज्यप्राप्ती पासून पेशवाईपर्यंतच्या उदयाचे डॉक्टरसाहेबांनी केलेले चित्रण. सुमारे १५० पृष्ठांचे हे विवेचन अतिशय मार्मिक असून या भागामध्ये लेखकाने आपले सारे अंतःकरण ओतले आहे. यातील 'महाराष्ट्र धर्म' आणि 'स्वराज्य व स्वधर्म' या दोन प्रकरणांमध्ये सामर्थ्यांच्या दासबोधातील राष्ट्रप्रबोधनपर विचारांचे अगदी मर्मग्राही आलोडन करण्यात आले आहे. समर्थांनी सामर्थ्य, शक्ती आणि संघटना यांच्या उपासनेचा केवळ महामंत्रच उद्घोषित केला नाही, तर त्यातून बुद्धिवादाची आणि राष्ट्रवादाची प्रखरता निर्माण केली. ऐश्वर्याकांक्षा प्रपंच, लोकजागृती, शक्ती, यत्नदेव, चातुर्य, साक्षेप, देशकालाचे भान याबद्दलचा समर्थांचा वेगळा दृष्टिकोण या एका प्रकरणातून नेमका मांडला आहे, तर दुसऱ्या प्रकरणातून त्यांच्या साऱ्या विवेचनाला स्वराज्य आणि स्वधर्म यांची बैठक कशी सर्वांगाने व्यापून राहिली आहे हे दाखविले आहे. सामर्थ्यांच्या या वैचारिक भूमिकेच्या पार्श्वभूमीवर शिवप्रभूंच्या कारकीर्दीचे केलेले चित्रण या ग्रंथात अगदी कळसाप्रमाणे उठून दिसते. शिवाजीने आपले वैरी कोण हे सुरुवातीला नेमके ओळखले आणि आपल्या अंगच्या असामान्य योजकतेने या साऱ्या शत्रूंवर मात करून स्वराज्याची आणि स्वधर्माची प्रतिष्ठापना कशी केली, याचे येथील चित्रण बहारीचे आहे. शस्त्रनिष्ठा, शास्त्रनिष्ठा, धर्मनिष्ठा आणि पुरुषप्रयत्न यांचा शिवाजीच्या ठिकाणी असाधारण संगम कसा झाला होता आणि त्यामुळे शिवाजीने अर्थकारण, राजकारण, आणि समाजकारण इ. राष्ट्राच्या महत्त्वाच्या साऱ्या अंगात आपल्या असाधारण प्रतिभासामर्थ्याने एक नवा उज्ज्वल प्रकाश दाखविला, याचे हे विवेचन महत्त्वाचे आहे, मार्मिक आहे, उद्बोधक आहे आणि तितकेच परिणामकारकही.

डॉक्टर सहस्रबुद्धे म्हणजे महाराष्ट्रातील चिपळूणकर व टिळक–आगरकरी परंपरेचा वारसा चालवणारे आधुनिक काळातील एक थोर निबंधकार. राष्ट्रप्रबोधनासाठी त्यांनी आपली लेखणी व वाणी झिजविली, केवळ संशोधनात्मक ज्ञानोपासना हा त्यांच्या व्यासंगाचा, लिखाणाचा एकमेव हेतू नाही. त्यांना समाजाला काही सांगायचे आहे, शिकवायचे आहे आणि त्यासाठी पांडित्य हे त्यांनी निष्ठापूर्वक जोपासलेले एक माध्यम आहे अशा दृष्टिकोनामुळे त्यांनी एकहाती केलेल्या या प्रचंड ग्रंथनिर्मितीमध्ये त्यांचे आग्रह, त्यांची मते व्यक्त होणार व कुठे कुठे वादग्रस्त विषयावर दुमत राहणार हे स्वाभाविकच आहे; पण यामुळे त्यांच्या विद्वत्तेला, तपश्चर्येला काहीही उणेपण येत नाही. या तपश्चर्येच्या खुणा या ग्रंथात जागोजाग आढळतात. या खुणा पाहत असताना सारखे वाटत राहते की, हा असा लोकशिक्षणाचा वारसा यापुढे कोण चालवणार? कसा चालवणार? वर्षानुवर्षे द्रव्याची, मानापानाची अपेक्षा न बाळगता लोकांना शहाणे करून सोडण्याची लोकशिक्षकाची तळमळ आज दिसत नाही. ठायी ठायी ही तळमळ डॉक्टरांच्या सर्वच ग्रंथांत आजवर दिसून आलेली आहे. हा ग्रंथही त्याला अपवाद नाही. श्री. म. माटयांकडून डॉक्टरांना चिपळूणकरी वारसा मिळाला. त्यात स्वतःची थोडी भरच घालून त्यांनी तो पुढल्या पिढ्यांच्या स्वाधीन या ग्रंथाद्वारे केलेला आहे. 'शहाणे करून सोडावे सकल जन' हा त्यांच्या आवडत्या संताचा उपदेश त्यांनी तंतोतंत आचरणात आणून दाखवलेला आहे महाराष्ट्रभर पसरलेले त्यांचे विद्यार्थी, या विषयाचे अभ्यासक व सर्वसामान्य मराठी वाचक निवृत्तीच्या काळातही डॉक्टरांनी केलेल्या या प्रचंड उद्योगाची योग्य ती दखल घेतील अशी आशा आहे.

*

महाराष्ट्र संस्कृती
लेखक : डॉ. पु. ग. सहस्रबुद्धे
प्रकाशक : कॉंटिनेंटल प्रकाशन, विजयानगर, पुणे ३०
पृष्ठे : ८३५ (डेमी), मूल्य : रुपये साठ

# स्वप्न साकार करणाऱ्या योजना सादर करणारी महाबँक



बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कार्यालय : लोकमंगल,
पुणे ४११ ००५.

बँकिंग सेवा
व्यक्तिगत जिव्हाळा


पद्मजा

## हिचकॉकच्या कथा ( १ )

### स्वैर अनुवाद : रवींद्र गुर्जर



# खुनाची कलाकृती

श्रीमंत घराण्यात जन्मलेल्या आल्फ्रेड हिचकॉकला लहानपणापासूनच प्रवासाची अत्यंत आवड. आठ वर्षांचा होईपर्यंत लंडनमधल्या झाडून सगळ्या बसमार्गावर तो एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत फिरला होता. भोवतालच्या जगाचं सूक्ष्म निरीक्षण त्यानं याच वेळी सुरू केलं. मनुष्यस्वभावाचे बारकावे अचूक टिपायला तो शिकला. पुढे हे शिक्षण त्याला आयुष्यभर पुरलं.
इंजिनिअरिंगचा अभ्यासक्रम सुरू असताना त्यानं 'आर्ट 'वरही धडे घेतले. चित्रपटनिर्मिती आणि दिग्दर्शन — या गुंतागुंतीच्या व्यवसायात त्याला दोन्ही विषयांचा पुरेपूर उपयोग झाला. अपेक्षित असलेलं दृश्य कॅमेऱ्यासमोर उभं करताना दिसून येणारं त्याचं तांत्रिक कौशल्य उल्लेखनीय ठरलेलं आहे.
ॲडव्हर्टायझिंग डिपार्टमेंटमध्ये 'ले-आउट आर्टिस्ट ' म्हणून त्यानं करियर सुरू केली. थोड्याच अवधीत त्याला फेमस-प्लेयर्स-लास्की (आताची पॅरामाउंट) कंपनीत 'सब् टायटल्स् ' लेखक म्हणून प्रवेश मिळाला. त्या वेळी १९२० साली सदर कंपनीची लंडनमध्ये शाखा उघडली होती.
अशा रीतीनं १९२० मध्ये त्यानं चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला आणि पुढं साठ वर्षं चित्ररसिकांच्या हृदयांवर स्वामित्व टिकवलं. स्टुडिओतील सर्व विभाग त्यानं यशस्वीपणे हाताळले; परंतु दिग्दर्शक म्हणून त्याची कारकीर्द अविस्मरणीय आहे. त्याची एकाहून एक सरस असलेली चित्रं, हीच साक्ष देतील.
तो नेहमी म्हणत असे : 'दिग्दर्शकाची महत्त्वाची जबाबदारी म्हणजे प्रेक्षकाला सतत जागं ठेवणं. दीड-दोन तास तुम्ही त्याला एकसारखं चौकोनी पडद्यावर बघायला सांगता. तेव्हा त्या जागी त्यानं बघत राहावं असं काही तरी विशेष तुम्हाला चालू ठेवायलाच पाहिजे !'
त्यानं चित्रपटासाठी निवडलेल्या—अर्थातच त्याला आवडलेल्या—कथांचं वैशिष्टच काय ? तो रहस्यपटांचा सम्राट ठरला होता. त्याच्या दृष्टीनं रहस्यकथा म्हणजे गुन्हा कोणी केला, हे सांगणं एवढंच नाही. तो केव्हा, कसा आणि कोणत्या परिस्थितीत घडला, हे महत्त्वाचं. बऱ्याच वेळा गुन्हेगार आधीच कळलेला असतो. तरीही कथेचा रसभंग मात्र होत नाही.
हिचकॉक म्हणतो : काही जणांच्या मते रहस्यकथा, भयकथा वाचून माणसावर आरोग्यदायी परिणाम होतो. त्याच्या गुन्हेगारी प्रवृत्ती नाहीशा होतात. त्याला जे जे करावसं वाटत होतं—पण जागेवरून उठून जाऊन त्यासाठी खटपट करणं जमत नाही—त्या गोष्टी बसल्या बसल्या बघायला मिळतात आणि एक प्रकारे गुन्ह्याचा आनंद लुटता येतो. त्यामुळे अपुऱ्या राहिलेल्या, दबलेल्या इच्छा-आकांक्षा जागीच जिरून जातात.
त्यानं संपादित केलेल्या कथांमध्ये विषयांची विविधता आहे; पण सगळ्या कथा खुनाभोवती फिरत असतात आणि त्या खुनांमध्ये काही वैचित्र्य आढळतं. बदमाषांच्या टोळीनं धडाधड पाडलेले खून या कथांमध्ये दिसणार नाहीत. या 'क्षेत्रा 'तील 'भरीव ' कामगिरी नवोदितांकडून झालेली आढळते. ते अतिशय बुद्धिमान असतात—पण काही झालं तरी नवशिकेच ! त्यांच्या 'कामा 'त एक प्रकारची अदब, नाविन्य, चांगली अभिरुची आणि कशाविरुद्ध तरी चीड दिसून येते. पुन्हा, 'आम्ही असे का बनलो ?' हे सांगून ते तुम्हाला त्रास देत नाहीत, शिष्टाचार सोडत नाहीत.

हिचकॉकला आवडलेल्या पण चित्रपट किंवा टी. व्ही. साठी निवड करता न आलेल्या काही कथांचा परिचय माणूसमधून क्रमशः करून द्यायचा विचार आहे. या कथा एकटयानं वाचताना खरी गंमत आहे. त्या वेळी आसपास लोक असतील तर त्यांना पिटाळून लावा, असा हिचकॉकचाच मित्रत्वाचा सल्ला आहे....

---

# १

एखाद्या ठिकाणाविषयी, किंवा व्यक्ती-विषयी, प्रत्यक्ष पाहण्यापूर्वी आपण काही अंदाज बांधतो; पण आज त्याचा दोन्ही बाबतीत अपेक्षाभंग झाला. फुलांनी बहरलेल्या परिसरातील तो बंगला आणि त्याची मालकीण, दोन्ही बाबतीत त्याचा अंदाज सपशेल चुकला. चाळीस वर्षांची मादाम शेलाँ खुनी स्त्रियांच्या कुठल्याही गटात बसत नव्हती.

बागेत हिरवळीवर खुर्च्या टाकून ते दोघे बसले होते. तो अधिकच जागरूक झाला, अशा स्त्रिया फार धोकेबाज, ही केस फार काळजीपूर्वक हाताळली पाहिजे. तिच्या गडद डोळ्यांतील भाव त्याला वाचता येत नव्हते.

ती अतिशय आकर्षक होती. अठरा वर्षांच्या युवतीशी ती नक्कीच स्पर्धा करू शकेल. गालांचा टवटवीतपणा, सुडौल बांधा आणि प्रमाणबद्ध सौंदर्यस्थळं, त्यानं जवळून निरीक्षण केलं होतं. नाही तर तिच्या वयाच्या बायका बघाव्यात, सगळ्या बाजूनं सुटलेल्या, अगदी जिभेकडूनही सैल; पण ही सुंदर स्त्री मात्र साठाव्या वर्षी सुद्धा अशीच दिसेल. यापेक्षा कमी नाही की अधिक नाही !

'सरबत घेणार, इन्स्पेक्टर मायरन ?' तो काही बोलण्यापूर्वीच तिनं पेले भरायला सुरुवात केली होती. तो नकार द्यायच्या बेतात असलेला पाहून तिला मौज वाटली. क्षणभर चमकलेल्या तिच्या डोळ्यांवरून त्यालाही ते समजलं. चांगल्या अदबशीर वागणुकीची तिला सवय असल्यामुळं तिनं चेहरा गंभीर ठेवला.

'थँक यू,' स्वतःवर वैतागलेला इन्स्पेक्टर कसंबसं म्हणाला.

मादाम शेलाँनं पेयाचा लहानसा घोट प्रथम घेतला. जणु तिला असं सुचवायचं होतं की, 'पहा, इन्स्पेक्टरसाहेब, तुम्ही अगदी सुरक्षित आहात!' हा अभिप्राय अतिशय सूक्ष्म होता, सफाईदार होता. बाईची खरो-खर कमाल आहे.

मंदपणे हसून ती रोखठोक म्हणाली 'मी माझ्या दोन यजमानांवर विषप्रयोग केला काय, याचा तपास घेण्यासाठी तुम्ही आलेले आहात !'

'मादाम !' इन्स्पेक्टर मायरन खलासच झाला. 'मादाम, मी ---'

'तुम्ही राज्यपालांना भेटून खास परवा-नगी काढली असणार!' ती शांतपणे म्हणाली.

त्यानं स्वतःला सावरलं आणि ठेवणीतल्या हुकमी पण संथ स्वरात म्हणाला, 'मादाम, मी तुमची परवानगी घेण्यासाठी आलेलो आहे. जानेवारी १९३९ मध्ये मरण पावलेल्या मि. वेसर आणि मे ४६ मध्ये निधन झालेल्या मिस्टर शेलाँ या दोघांची शवचिकित्सा करायची आहे. काही अवयवांची अधिकृत तपासणी घ्यायची आहे. तुम्ही इथल्या पोलीस-स्टेशनच्या सार्जंटला परवानगी नाकारलीत, ती का ?'

'त्या सार्जंटला नम्रपणा, सौजन्य ठाऊकच नसावं. मला त्याचा तिटकारा आला, तुम्ही त्याच्यापेक्षा वेगळे आहात. त्या गैर-प्रवृत्तीशी माझं वाकडं आहे, कायद्याशी नाही!' तिनं पेला पुन्हा उचलला आणि ओठांशी भिडविला. 'मी तुम्हाला नकार देणार नाही, इन्स्पेक्टर!' तिच्या नजरेत कौतुक भरलं होतं.

'तुम्ही फारच स्तुती चालवलीय.'

'कारण, तुम्हा पॅरिसच्या पोलिसांची पद्धत मला ठाऊक आहे. माझी पक्की खात्री आहे की तुमची ती चिकित्सा यापूर्वीच गुप्त-पणे उरकण्यात आलेली आहे.' त्याच्या चेह-ऱ्याचे बदललेले रंग पाहण्यासाठी ती क्षणभर थांबली; पण आपल्या चेहऱ्यावर तिनं तसं दर्शवलं नाही. 'आणि तपासणीत काहीच निष्पन्न न झाल्यामुळे तुम्ही गोंधळलेले आहात या केसमध्ये तुम्ही नवीनच आहात त्यामुळे माझा अंदाज घेण्यासाठी, माझं वर्तन, स्वतःवरचा ताबा–आणि बोलता बोलता माझ्याकडून एखादा धागा मिळतो का हे बघण्याचा तुमचा प्रयत्न असणार. ज्यायोगे माझ्यावर गुन्हा लादता येईल!'

तिचे टोले अचूक बसल्यामुळं त्यातलं काही नाकारणं म्हणजे मूर्खपणाच होता. त्यापेक्षा स्पष्ट बोललेलं केव्हाही उत्तम. त्यानं त्वरीत निर्णय घेतला. 'अगदी खरं आहे मादाम, शब्दशः सत्य पण, – त्यानं तिचं बारकाईनं निरीक्षण केलं– 'जेव्हा एखाद्या बाईचे दोन नवरे– वयस्कर पण अगदी म्हातारे नाहीत– दोघांनाही जोरदार उलट्या आणि जुलाबां-मुळं मृत्यू यावा, तोही प्रत्येक लग्नानंतर दोन वर्षांच्या आत ---- प्रत्येकाची अफाट मालमत्ता आणि ती सगळी विधवेला मिळावी ---- हा योगायोग विलक्षणच नाही का ?'

'अर्थातच' मादाम शेलाँ जागेवरून उठली आणि चार हातांवर जाऊन उभी राहिली. इन्स्पेक्टर तिच्या सौंदर्याकृतीकडे एकटक बघत होता. 'माझ्याकडून तुम्हाला पूर्ण कबुलीजबाब हवाय का इन्स्पेक्टर ?" तिच्या आवाजात विलक्षण जादू होती. तिच्या साठी कोणीही पागल होईल. आपण मात्र तोल जाऊ देता कामा नये. इन्स्पेक्टर खरो-खर सावध बनला.

'तुमची तशी तयारी असेल तर, मादाम शेलाँ,' तो शक्य तितका संयम राखून म्हणाला. बाई भयानक आहे. जबरदस्त तयारीची आहे.

'आपली मेहेरबानी !' मादाम आता हसत नव्हती. वाऱ्याच्या झुळकीबरोबर तिनं लावलेल्या मादक सेंटचा गंध त्याला आला. त्याने आपली वही सरसावली. ती इतक्या सहजासहजी बोलेल अशी शंकासुद्धा त्याला नव्हती आणि तरीही....

'तुम्हाला पाककलेसंबंधी थोडीबहुत माहिती आहे का मि. मायरन ?'

'मी पॅरिसचा रहिवासी आहे, यावरून काय ते समजा!'

'आणि प्रेमाची कलासुद्धा?'

'सांगितलं ना, मी पॅरिसचा आहे!'

तिनं दीर्घ श्वास घेतला. त्यामुळं तिची छाती उन्नत झाली. 'मग मी तुमच्याजवळ अशी कबुली देते की....मि. शेलाँ यांना मी सावकाश आणि हेतुपरस्पर, पद्धतशीरपणे ठार केलेलं आहे. त्या वेळी ते ६५ वर्षांचे होते. आणि पहिले यजमान मि. वेसर--वय ५७- यांचाही मी त्याच पद्धतीनं काटा काढला.'

'काही कारणासाठीच असेल, नाही का?' हे स्वप्न म्हणायचं की वेडाचा झटका?

'मि. वेसर यांच्याशी मी विवाह केला, तो घरच्या मंडळींच्या आग्रहावरून,मी त्यावेळी 'तरुण मुलगी' या सदरात बसत नव्हते. दोन आठवड्यांच्या आतच माझ्या ध्यानात आलं की वेसर हे डुकराच्या जातीचे होते-सदैव वखवखलेले असायचे अतिशय घमेंडखोर, उधळ्या स्वभावाचे पण गरीबांना लुटणारे आणि निष्पाप लोकांना फसवणारे होते. गुरासारखे चरायचे. थोडक्यात, शिसारी येईल असा तो प्राणी होता. वाढत्या वयाबरोबर गंभीर अपराध वाढतच होते. नाजुकपणा किंवा उमदेपणाचा कुठं स्पर्शच नाही! शिवाय या सगळ्या गुणांमुळे त्यांचं पोटही भक्कम राहिलं नाही.'

इन्स्पेक्टरनं पॅरिसमध्ये मि. वेसर याची माहिती काढली होती ती या वर्णनाशी जुळत होती. त्यानं मान डोलावली. 'आणि मि. शेलाँ?'

'त्यांचं वय वाढलेलं होतंच-त्यांच्याशी लग्न केलं तेव्हा मीही प्रौढ झाले होते.'

किंचित उपरोधानं इन्स्पेक्टर म्हणाला, 'त्यांचं पोटही कमकुवत असेल-कदाचित?'

'प्रश्नच नाही! कमकुवत इच्छाशक्ती म्हणा फार तर. ते वेसर यांच्यापेक्षा कमी रानटी ठरतील, पण खाण्यापिण्याच्या बाबतीत त्यांचा जिभेवर ताबा नव्हता. बाजारातले उत्तमोत्तम, पचायला जड आणि दुर्मिळ खाद्यपदार्थ, त्याच्या जोडीला उंची मद्याचा रतीब. ज्या वेळी लहान लहान मुलं अन्नपाण्यावाचून रस्त्यावर चक्कर येऊन पडत होती. इन्स्पेक्टर, मी जरी खुनी बाई असले असं मानलं, तरी एक फ्रेंच स्त्री आहे. म्हणून मी ठरवलं की वेसरप्रमाणं शेलाँ हे सुद्धा जगातून नाहीसे झाले पाहिजेत. मला त्याचा यत्किंचितही खेद वाटत नाही'

तिच्या बोलण्याचा ओघ खंडित होऊ नये इतक्या हलक्या स्वरात त्यानं विचारलं. 'तुम्ही कोणता उपाय योजलात, मादाम?'

ती वळली, तिचा चेहरा हास्यानं फुलला होता. 'तुम्हाला या मांसाहारी डिशेस ठाऊक असतील!' तिनं काही स्वादिष्ट, चमचमीत पण पचायला त्रासदायक अशा पदार्थांची नावं घेतली. नावं संपता संपेनात!

"थांबा, मादाम शेलाँ! मला तुम्ही या पदार्थांमध्ये बडवन टाकू नका! माझ्या जिभेला सुटलेल्या पाण्यात मी कदाचित वाहून जाईन इतकं पाककौशल्य, इतकी...'

'तुम्ही खुनाचं तंत्र विचारलंत ना, इन्स्पेक्टर! मी या आणि इतर शेकडो डिशेस बनवल्या आणि दरवेळी त्यात काय मिसळत गेले तर...अगदीअल्पांशानंच; पण ...' ती एकदम बोलायची थांबली.

इन्स्पेक्टरच्या हातांना कंप सुटला. त्यानं सरबताचा पेला कसाबसा खाली टेकवला. 'तुम्ही अल्प. अंशानं त्यात काय मिसळलं, मादाम?'

'तुम्ही माझ्या बाबतीत तपास घेतलेला आहे. तेव्हा माझे वडील कोण होते, ही माहिती तुम्हाला असणारच!'

'सगळी माहिती आहे. ते अत्यंत सज्जन आणि निष्कलंक असे गृहस्थ होते.'

'होय. आणि मृत्युपूर्वी-मी तेव्हा २१-२२ वर्षांची असेन-ते नेहमी म्हणत की 'तू माझी मुलगी शोभतेस. त्यांना जास्तच कौतुक करण्याची सवय होती. धर्मोपदेशाचं काम मी करू शकेन, असा त्यांना विश्वास होता.'

'वा, बाई वा! धर्मोपदेश काय?'

'खरोखर कौतुकाची बाब आहे. मी तुम्हाला मानतो.' या देखण्या बाईला असंबद्धही बोलता येतं तर! इन्स्पेक्टरनं डोळ्यांच्या शिरा ताणल्या. 'पण तुम्ही सांगत होतात की त्या चविष्ट पदार्थांमध्ये तुम्ही काही तरी मिसळत होता...अल्पांशानंच का होईना-'

मादाम शेलाँनं त्याच्याकडे पाठ वळवली. तिचे खांदे छान होते. त्याच्या ध्यानात आलं. कंबर दुर्लक्ष करण्याजोगी नव्हती आणि मस्त नितंब. त्याच्याकडे पाठ तशीच ठेवून, ती म्हणाली, 'थोडसं--कौशल्य, दुसरं काही नाही, इन्स्पेक्टर! खाद्यपदार्थ बनवण्यातील अजोड कौशल्य! वेसर आणि शेलाँसारखी माणसं त्याला बळी पडतील, तर काय नवल! रोज तीन-चार वेळा मी त्यांना निरनिराळे स्वादिष्ट पदार्थ खायला घालत होते. टुडुंब पोट भरल्यावर झोप काढायची आणि उठल्यावर पुन्हा नवे पदार्थ तयार असायचेच. जोडीला अनिर्बंध मद्यपान त्यामुळं जेवण चार घास जास्तच जायचं. आता तुम्हीच सांगा की या वयात हाच कार्यक्रम अव्याहत चालला तर कोण जगेल? त्या मानानं दोघंजण जास्तच जगले'

काही काळ शांतता पसरली. दूरवर घड्याळाची टिक्टिक् चालू होती. आणि प्रेम, मादाम शेलाँ? माफ करा, पण मघाशी तुम्हीच त्याचा उल्लेख केलात म्हणून विचारलं'

'उत्तम अन्न सेवन केल्यावर प्रेमाला काय कमतरता-म्हणजे त्यालाच प्रेम म्हणायचं असेल तर. त्यांचं वय--असो. मी तर घरचीच होते. शिवाय बाहेर लहानमोठ्या मैत्रिणी असायला मी कधीच आडकाठी घेतली नाही. अशा रीतीनं ते दोघेही मरण पावले- मि. वेसर ५७ व्या वर्षी, मी. शेलाँ ६५ व्या वर्षी बस्स, इतकंच!'

पुन्हा शांतता. इन्स्पेक्टर मायरन ताडकन उभा राहिला. ती दचकून मागे सरकली तिचा चेहरा उतरला होता.

'तुम्हाला आज संध्याकाळी माझ्याबरोबर यावं लागेल, मादाम शेलाँ.'

'पोलिसस्टेशनवर, इन्स्पेक्टर?'

'नाईसमधल्या एका उत्तम रेस्टॉरंटमध्ये मादाम! तिथे संगीताच्या पार्श्वभूमीवर शॅम्पेन घेताना आपल्याला आणखी काही बोलता येईल.!'

'पण इन्स्पेक्टर मायरन--!'

'मी काय म्हणतो ते नीट ऐका! मी अद्याप अविवाहित आहे. वय ४४. दिसायला फारसा वाईट नाही, असं लोक म्हणतात. माझी बचत चांगली आहे, गर्भश्रीमंत नाही, पण विचार करण्याइतपत नक्कीच आहे.' त्यानं तिच्या डोळ्यांत खोल पाहिलं. 'आणि मला मरायची इच्छा आहे.'

तो छाती फुगवून आणि खांदे ताठ करून उभा होता. मादाम शेलाँचे गहिरे डोळे त्याच्या सर्वांगावरून सहेतुकपणे फिरू लागले, त्यात कसलाही संकोच नव्हता.

'खाद्यपदार्थांचा योग्य प्रमाणात समाचार घेतला तर ते घातक ठरतातच असं नाही,' मादाम सरतेशेवटी विचारपूर्वक म्हणाली. 'इन्स्पेक्टर मायरन, माझ्या हाताचं चुंबन घ्यायला तुम्हाला आवडेल का?' ☐

**मूळ लेखक : सी. पी. डॉनेल (ज्यु.)**

श्री. अनंत माने यांनी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केल्याला येत्या १ जूनला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. त्याच दिवशी त्यांचा ५० वा चित्रपटही पूर्ण होत आहे. त्या निमित्ताने ही मुलाखत. मुलाखत घेतली आहे कोल्हापूरचे प्रा. श्रीकांत नरुले यांनी.

# मला माझ्या चित्रांचा रात्रंदिवस ध्यास लागलेला असतो!

## –दिग्दर्शक अनंत माने

उन्हाची खाई पेटलेली होती. अनंतराव माने यांनी भेटीची वेळ दुपारी दोनची दिलेली. नुकतेच जेवण झालेले. पापण्या जडावल्या होत्या. कदाचित मानेसाहेबांना विश्रांती हा शब्द ठाऊक नसल्याने अशाच दुपारी दोनच्या वेळा त्यांनी आतापर्यंत दिलेल्या असाव्यात. मी 'शांतकिरण' मध्ये वेळेवर पोहोचलो. वेळेवर वागणे, वेळेचे बंधन पाळणे हा मानेसाहेबांचा धर्म असल्याने दोनला पाच मिनिटे कमी असतानाच ते माझी वाट पहात होते. माडीवरच्या खोलीत मी पंख्याजवळच्या खुर्चीवर बसलो. जेवढे खोचक प्रश्न विचारता येतील तेवढे मी विचारायला सुरुवात केली. पहिला प्रश्न केला–

'मला वाटतं अण्णा, तुम्ही तुमच्या चित्रांना नवे कलाकार कधी स्वीकारले नाहीत. नव्यांची रिस्क घेणं तुम्हाला परवडत नसावं.'

मानेसाहेबांनी मला शांतपणे आख्खाच्या आख्खा न्याहाळला आणि आपली दृष्टी खिडकीतून पलीकडे डोलणाऱ्या हिरव्यागार पिंपरणीच्या डौलदार शेंड्यावर टाकली. माझ्याकडे न पहाताच ते बोलू लागले–

'असाच प्रश्न मला माझे लाडके संगीत-दिग्दर्शक वसंत पवार यांनी केला होता. तो तर बिचारा धाडसानं म्हणाला. 'अण्णा, आम्ही मोठे कलाकार आहोत म्हणून तुमची चित्रं चालतात. आमच्याशिवाय तुम्ही काही करू शकणार नाही!' मी विचार करू लागलो खरोखरीच चित्रपट नुसत्या चांगल्या दिग्दर्शकावर चालतो की चांगल्या कलाकारांवर? वसंतरावांचा प्रश्न मला बोचला. मी ठरविले की, मीच माझी परीक्षा घ्यायची. खरोखरीच मला काही येतं का? चालू ठेवलेला चित्रपट मी थांबविला आणि वसंतरावांचा चॅलेंज मी स्वीकारला!

'म्हणजे काय केलंत?'

'वसंतरावांना सांगितलं, तुम्हा सर्वांना सोडून मी चित्र करणार आहे. मला उगाच वाटतं, का मला या क्षेत्रातलं काही कळतं– तेही तपासून पाहाणार आहे. एकदा निकाल लागू दे होऊन जाऊ दे काय होतंय ते! आणि मी कामाला सुरुवात केली. पार लेखकापासून प्रत्येक माणूस नवीन घेतला. राम कदम हरहुन्नरी माणूस. एकदा ते शंकर पाटलांना घेऊन आले. मी त्यांना लेखनाचे काम दिले. उषा चव्हाण व लीला गांधी माझ्या चित्राच्या दोघीही हिरॉइन बनल्या. बर्चीबहाद्दरला आर्टिस्ट केले आणि 'केला इशारा जाता जाता' हे चित्र काढले. त्यात घेतलेली बाकीची माणसं नवीनच होती. वसंत पवारांच्याऐवजी राम कदमना म्युझिक दिलं. माझं ते चित्र सत्तर आठवडे चाललं.'

'तुमच्या कित्येक चित्रांना अफलातून यश मिळालं याचं कारण तुमच्या मते काय असावं?'

'मला माझ्या कामाचा–चित्राचा रात्रंदिवस ध्यास लागलेला असतो. हेच त्याचं कारण आहे.'

अण्णांनी परत शांतकिरणमधल्या त्या हिरव्यागार पिंपरीवर दृष्टी टाकली आणि काही तरी आठवल्यानं ओलसर हसऱ्या डोळ्यांनी पहात ते सांगू लागले–

एकदा शंकर पाटलांना माझ्याबाबत या संदर्भात अनुभव आला आहे. एका चित्राच्या एण्डविषयी माझ्या मनात शंका निर्माण झाली. मी पुण्याला फोन लावला. नमाडेसाहेबांना कळविले की, मला चित्रपटाचा शेवट बदलावासा वाटतो. तुमच्याशी आणि शंकर पाटलांच्याबरोबर मला चर्चा करायची आहे. पाटीलसाहेबांच्याकडून एण्ड बदलून घ्यायचा आहे. नमाडे म्हणाले, आम्हीच येत आहोत. ते यायला निघाले आणि पेठ नाक्यावर त्यांची गाडी ब्रेकडाउन झाली. त्यात बराच वेळ गेला. रात्रीचे बारा वाजले होते. नमाडेसाहेब शंकर पाटलांना म्हणाले, मानेसाहेब झोपले असतील. आता जाऊन काही उपयोग होणार नाही. आपण जेऊ या आणि मग जाऊ. पाटील म्हणाले, तसं नको. माझी खात्री आहे, अजुनी ते जागे असतील. जेवून कोल्हापूरला पोचायला एक दीड तास लागेल; पण नमाडेसाहेबांनी त्यांचे न ऐकता जेवून घेतलेच. वाटेत शंकर पाटील म्हणाले, मानेसाहेब जागे असणारच. मी तुम्हाला आधीच सांगतो, माझी वाट पहात ते गॅलरीत येरझारा घालीत असणार! कारण तो एण्ड त्यांना अस्वस्थ करीत असेल. आपण गेल्यावर ते म्हणतील, पाटीलसाहेब, आता रात्र खूप झाली आहे. आपण उद्या डिसकस करू; पण मी एण्डबद्दल माझ्या काही तुम्हाला कल्पना सांगतो. त्या तुम्ही ऐकून घ्या. रात्रभर विचार करा. उद्या आपण डिसकस करू! आणि तसंच झालं. शंकर पाटील आधीच जे बोलले होते, तोच अनुभव त्यांना आला. माझ्या चित्रांच्या मागे ध्यास आहे."

अनंत माने यांची कलानिष्ठा जबर. आपलं चित्र का चालते हे जसं त्यांना ठाऊक त्याचप्रमाणे आपल्या पडलेल्या चित्रातील दोषही ते सांगतात. 'अशीच एक रात्र होती' या चित्राने त्यांना पैसा मिळवून दिला; पण त्यांच्या अनेक चित्रांप्रमाणे ते सुपरहिट गेले नाही. त्याबाबत ते म्हणाले, "त्या चित्रात मध्यंतरानंतर आच कमी झाली आहे."

"अण्णा, तुम्हाला तुमचे कोणकोणते चित्रपट आवडतात?"

'पठ्ठे बापूराव हे माझं पहिलं चित्र मला आवडलं. त्यानंतर अबोली, सुहागन, पुनवेची रात, धाकटी जाऊ, सवाल माझा ऐका, केला इशारा जाता जाता, एक गाव बारा भानगडी, असला नवरा नको ग बाई--हे चित्र चाललं नाही, पण ते पिक्चर मला आवडलं. पिंजरा, सुशिला, हळदी-कुंकू, सावज...'

'आणि मानिनी?'

अण्णा हसले आणि हसून म्हणाले, 'होय, आवडलं.'

'सुशिला हे अतिवास्तववादी–संज्ञाप्रवाही चित्र आहे. त्याची कादंबरी केली तर? ते चित्र तुम्ही जसे घेतलेय तशीच त्याची कादंबरी बनवायची.'

'तसे करायला काही हरकत नाही, पण मला वाटतं तसे करण्यापेक्षा हिंदी व गुजराथीत मी ते करतोय. पुढच्याच महिन्यात हिंदीत घेतोय. अनेक भाषांत ते झाल्यावर कादंबरीला डिमांड कितपत राहावी?'

'अण्णा, तुमच्या चित्रांनी युग निर्माण केलंय असं तुम्हाला वाटतं का? चिमणी पांखरंची कथा तुमची होती, पुढे तशाच प्रकारचे भावुक कौटुंबिक टचचे चित्रपट होत राहिले. सांगत्ये ऐकाचा प्रभाव तर अगदी कालपर्यंत होता. अजूनही मराठी चित्रपट त्यातून बाजूला होऊ पहात नाही.'

'त्याचं काय आहे, सुपर हिट चित्रांनी एक क्रेझ आपोआपच निर्माण होत असते. मग तसेच चित्रपट निघू लागतात.'

'जेव्हा शूटिंग नसतं तेव्हा आपली दिनचर्या कोणती असते?'

'घरी असेन तर मी सकाळी सहा वाजता उठतो. आंघोळ करतो. कोणीही मला पाहावे–जेव्हा शूटिंग नसतं तेव्हा मी ८ ते ८–३० वाजता हे अनंत माने तुम्हाला महालक्ष्मीच्या मंदिरात भेटतील. घरी नऊला पोचल्यावर मला अवसर असल्याने मी नाष्टा करतो. त्यानंतर जे वाचायला सुरुवात करतो ते एक वाजेपर्यंत. बरोबर एक वाजता जेवायला बसतो. दोनपर्यंत नुसती विश्रांती!'

'विश्रांती? अजब आहे. १५–२० मिनिटे जेवायला जात असतील, राहिलेल्या वेळात विश्रांती घेता म्हणजे झोप वगैरे?'

'नुसताच पडतो.'

'डोळे मिटून?'

'छेः–झोप येईल ना?'

'तरी मला वाटलंच–पुढे मग?'

'दोन ते पाचपर्यंत पुन्हा वाचन.'

'काय काय वाचता?'

'खूप व्हरायटीज वाचतो. डिटेक्टिव्ह, कधी चांगल्या निवडक कादंबऱ्या–हल्ली मात्र शाहूमहाराज, शिवाजी, ताराराणी यांची चरित्रं वाचत आहे, अगदी अभ्यास म्हणून, विकत घेऊन, माझ्याकडे चांगल्या पुस्तकांचा तीन हजारांवर संग्रह आहे. सायंकाळी एकटाच फिरायला जातो. दिवसभर वाचलेल्याचे चिंतन करतो. नव्या चित्रपटांच्या कथाही जुळतात.'

'शूटिंग असलं की स्टुडिओतील आपला दिनक्रम कोणता?'

'पुलेवाडीतून दत्ताच्या मंदिरातून घंटानाद ऐकू येतो. पाच वाजता सुखकर्ता दुखहर्ता ही आरती रोज ऐकू येते. तेव्हा मी माझे आटोपून चहा घेत असतो. ५ वाजून ५ मिनिटांनी दिवसभरच्या होणाऱ्या चित्रपटाचे शॉट डिव्हिजन तयार करतो. आठ-साडेआठला ते संपतात. माझ्या सहाय्यकाकडे ते मी ८–८॥ ला सुपूर्त करतो. दिवसभर मग माझ्या डोक्यात काही विचार नसतात. सायंकाळी ४ वाजल्यापासून पुन्हा दुसऱ्या दिवशीच्या शॉट डिव्हिजनचे विचार सुरू होतात. रात्रभर ते डोक्यात घोळत राहातात. शूटिंगच्या वेळी मग मला कसलीच पंचाईत पडत नाही. माझे पेपरवर्क कंप्लीट तयार असते. चित्रपटातील यशाची ही एक गुरुकिल्ली आहे.'

'खरा दिग्दर्शक कोणता?'

'ज्याला आधी–चित्रीकरणाच्याही आधी–पूर्ण चित्रपट दिसलेला असतो तो.'

'अण्णा, आता आणखी थोडं खाजगी विचारतो–जेवणातील आपल्या आवडी–निवडी कोणत्या आहेत?'

'माझी तशी कोणतीच आवड-निवड नाही. मला काहीही चालतं. मला डायबेटिस आहे. १९६८ला हे माझ्या लक्षात आले, मी तीन महिने पथ्य जोरात पाळले; पण पुन्हा नाही पाळले. माझे मन पथ्याच्या विरुद्ध तयार झाले. अमुक एक खायचे नाही, तमुक एक खायचे नाही, याला मी जगणे म्हणत नाही. डॉ. भद्रे यांना मी हे स्पष्ट शब्दात सांगितलं की, डॉक्टरसाहेब, मला असे जगायचे नाही, त्यानंतर मी शुगर चेक केली नाही, अडुसष्टनंतर आतापर्यंत!'

'माझा एक प्रश्न असा की, माणसाच्या आयुष्यात माणूस किती उत्साही आहे याच्यावर त्याचे खरे जगणे अवलंबून असते, आपण नेहमीच उत्साही असता, तेव्हा ...'

'काय खाता पिता असेच तुम्हाला म्हणायचे असेल? माझ्या चिरतारुण्याचे एक रहस्य आहे. मी सदैव कामात असतो. मी जेव्हा कष्ट करतो तेव्हा हेच चैतन्य मला आपोआप मिळते. माझा मोठा मुलगा किंवा माझी सौभाग्यवती मला नेहमी म्हणते, मी घरी असलो की आजारीच असतो, ताप येणे, डोके दुखणे, पोटदुखी सतावते, शूटिंगच्या वेळीही ते सुरू असते; पण मी व्यथा पार विसरतो, कामाच्या मस्त धुंदीत आजारपण पळून जाते!'

'तुम्हाला तुमच्या चित्राचे श्रेय चित्र पूर्ण होण्याच्या आधीच दिसते, माझा हा चित्रपट चालणारच ही ग्वाही तुम्ही आधीच देता, ही भविष्यवाणी कोणत्या जोरावर आणि कशी वर्तवू शकता? चित्रपटांचे अंदाज कुणालाच कळत नाहीत.'

'ज्या दिग्दर्शकाने चित्रपटाचे माध्यम प्रेक्षकांच्या डोळ्यांनी पाहिलेले असते त्याला ते सांगता येते. मला प्रेक्षकांचा वेध आहे, त्यांच्या काळजातूनच जणु माझा चित्रपट बोलतो. मला ते आधीच सांगून मोकळा होतो आणि माझे हे म्हणणे ९९ टक्के आतापर्यंत खरे झालेले आहे.'

'हे चित्रपटांच्या बाबतीत झालं, तुमचा एखादा कलाकार किंवा युनिटची एखादी व्यक्ती आपल्या वागण्यातून ती अशा तऱ्हेने पुढे जाईल असे तुम्ही सांगता आणि काही दिवसांनी ती व्यक्ती तशीच वागत जगत असलेली दिसते. या सांगण्याच्या मागे तुमचा तर्क आहे, निरीक्षण आहे की अनुभव आहे?'

'मी आपणाला सांगतो, अनुभव हा

आहेच. अनुभवाशिवाय एवढा पल्ला गाठता येत नाही. अनुभवाने मला 'निरीक्षण करायला शिकविले. अनुभवाने मला एक दृष्टी दिली आहे. त्यातूनच मी आडाखे बांधतो. बे दुणे चार हा जसा आडाखा तसे या माणसाला अमुक अमुक गायडन्स दिला तर अगदी करेक्ट वागेल असे मला वाटते. एखाद्या वेळेला आडाखे चुकत नाहीत असे नव्हे; पण इतक्या वर्षांचे चिंतन आणि अनुभव मला फसवीत नाहीत, धोका देत नाहीत. रत्न पारखणारा रत्न हातात घेतल्यावर अमुक रत्न खरे की खोटे हे तो अचूक सांगतो, धान्याचा व्यापारी धान्य हातात घेतल्याबरोबर सांगतो, हे धान्य कुठल्या मोलाचे आहे. एवढी माणसे माहितगार. एवढी चित्रे केल्यावर माणसाच्या स्वभावाचा आणि त्याच्या ध्येयात्मक गुणाचा मला नेमका अंदाज लागलेला आहे.'

'या एकाच व्यवसायात तुमची पन्नास वर्षे गेली. या क्षेत्राचा तुम्हाला कंटाळा नाही आला?'

'छे: – बाळपणापासूनचा चित्रपट हा माझा छंद आहे– ध्यास आहे. माणसाला जे मनापासून आवडते त्याचा त्याला वीट येत नाही. मी थकलेला किंवा दमलेला नाही, आज आणखी नवीनच चित्र मला मिळालेले आहे. आता माझी ५१ चित्रे होताहेत आणि मी नव्या चित्राचे स्वागत करीत आहे. मला चित्रनिर्मितीपेक्षा अन्य काही सुचतच नाही. मला दुसरे आयुष्यच नाही, जीना यहां–मरना यहां–इसके सिवा और जाना कहां...'

स्टुडिओच्या अंगणात राजन–अण्णांचे सहाय्यक– मला पाहून माझ्याकडे आले, मी त्यांना प्रश्न केला,

'अण्णांच्याकडे काम करताना आपण भाग्यवान आहोत असे आपणास वाटत असावे असे मला वाटते.'

'हो ना–अहो, त्यांच्याकडून खूपच शिकायला मिळते, स्पॉटवर तर अण्णांच्या कामाचा चांगलाच अनुभव येतो. ते फाइल हाती घेऊन सीन कधीच उघडत नाहीत.' अण्णा तोंडीच डायलॉग सांगतात पाठ केल्याप्रमाणे. मी अनेक वेळा फाइल पाहिली आहे; कधी कानामात्रेचाही फरक पडत नाही. अण्णा कॉंपिटंट आहेत. त्यांच्यापुढे आमची मात्रा काहीएक चालत नाही!'

'माझा चित्रपट अमुक तारखेपर्यंत पूर्ण होईल असे अण्णा आधीच निर्मात्याला सांगतात. रिलीजची तारीखही देतात. थिएटरही बुक होते, ही त्यांची पद्धती मोठी मौजेचीच आहे नाही?'

'अर्थातच, हे सारे घडते कसे हा तुमचा प्रश्न असावा. अण्णांच्याबरोबर ज युनिट काम करते त्याला एक मोठी शिस्त आहे. आम्ही सातला म्हणजे सकाळी सातलाच येतो, त्यांच्या सूचना पाळणे हा आमचा नैतिक धर्म आहे, आमचे युनिट असे बांधले गेले आहे की, घडयाळाचा काटा जसा साठ सेकंद पुढे गेल्यावर एक मिनिट पुढे सरकतो, त्याप्रमाणे आमच्या युनिटमध्ये ह्याने काम केल्यावर दुसरा ते काम आपोआप करणारच, ही गॅरंटी आहे. त्यांचा मुलगा स्वत: प्रॉडक्शन पाहात असतो, स्वत:चेच प्रॉडक्शन आहे असे समजून सगळ्या गोष्टी तो करतो. प्रॉपर्टी आणायला कधीही वेळ लागत नाही, अण्णा सकाळी जे शॉट डिव्हिजन करून आम्हाला देतात, त्यामुळे भराभर शॉटस घेतले जातात. संध्याकाळी सहाला संपणारे काम चारलाच संपते. 'लक्ष्मी'तला कोर्ट सीन तुम्ही पाहिला असावा. त्यामध्ये तीन सीनचे जवळजवळ टोटल २२० शॉटस होतात. कोणालाही ते शूट करायला ८ ते १० दिवस लागले असते. पण अण्णांनी कंप्लीट शॉट डिव्हिजन केल्यामुळे, प्रत्येकाचा लुक कुठे हे ठरलेले असल्याकारणाने निळूभाऊंचे तर निळूभाऊंचेच, रंजनाचे तर रंजनाचेच असे शॉटस घेतले गेले. जे काम आठ दिवसांत व्हायचे ते फक्त आम्ही तीन दिवसांत पुरे केले. म्हणून आमच्याकडील कामाची स्पीड, रिलीजची तारीख द्यायला मदत करते. आमच्याकडे काम अगदीच जलद होते. जे पिक्चर पाच महिन्यांत अण्णा पूर्ण करून देणार असतात ते बहुतेक चार महिन्यांतच पूर्ण करून देतात!'

मी झाडाजवळच्या आराम–बाकड्याकडे आलो. रुबाबदार व्यक्तिमत्त्वाचा अण्णांचा मुलगा विलास गाडीजवळ उभा होता. मी त्यांना विचारले, 'आपल्या पिताजींच्या बाबतीत आपण अधिक काही बोलू शकाल?'

विलासने शेजारच्या वेलीवरचे एक फूल तोडून माझ्या हाती हसत हसत दिले, विलासराव एकच वाक्य बोलले–

'माझी श्रद्धा दोघात विभागली गेली आहे– शांतारामबापू चित्रदुनियेत भगवान कृष्णाप्रमाणे मला वाटतात आणि आमचे अण्णा प्रभु रामचंद्राप्रमाणे.'

मला विलासच्या मातोश्रींचे – ज्यांना आम्ही आई म्हणतो त्यांचे – अण्णांच्या सन्दर्भातले एक वाक्य आठवले. नातवंडाच्या बोटात पेन्सिल हट्टाने ठेवून श्रीकार गिरवायला शिकवीत त्या म्हणाल्या होत्या.

'अहो, यांचे लग्न प्रथम चित्रपटाशी लागले आणि नंतर माझ्याशी! □


मोठमोठ्यांना जे साधत नाही वास धलेले नाही ते येथे एका शाळाकॉलेजात न गेलेल्या स्त्रीने सहजगत्या साधले आहे... —प्रा. वा. ल. कुलकर्णी

(प्रास्ताविकातून)

# सांगत्ये ऐका

**रसिकांची, समीक्षकांची, सर्वसामान्य वाचकांची दाद लाभलेले हंसा वाडकर यांचे अनोखे आत्मचरित्र.**

तिसरी आवृत्ती । किंमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# रंगभूमी

विवेक महाडिक

# दिवाकर

## पालेकरी तंत्राचा आविष्कार !

**१९१२** साल. एक मिटत चाललेली संध्याकाळ. शाळेचे विस्तीर्ण प्रांगण. संथ धीमी पण निश्चित पडणारी, घराकडे निघालेली पावलं. गोलाकार चष्म्याच्या फ्रेममधून दिसणारी शिक्षकी नजर आणि डोक्यात अबोल आवर्त. आवर्त-प्रश्नचिन्हांचं प्रश्नचिन्हांवर प्रश्नचिन्ह आपटणार आणि नव्या प्रश्नचिन्हालाच जन्म देणारे. दिवाकरांचं नांव घेतलं की एक युगानुयुगांचे व्यक्तिचित्र डोळ्यांसमोर उभे राहाते. तेही बरेचसे भावातीत पातळीवर संवाद साधणारे आणि उरलेले व्यवहारात्मक शब्दांच्या पातळीवरचे. दिवाकर म्हणजे मराठी सनातन्यांनी जपलेले सफल वैफल्य होय; पण वैफल्य ते सुद्धा स्वतःच्या आगळ्या वेगळ्या तंत्राने नटलेले. त्या जुन्या काळी काही जणांना अतिशय अस्वस्थ करणाऱ्या विचित्र शैलीने दिवाकर कालमापनाच्या कैक योजने पुढे निघून गेले. त्यांच्या साहित्याची उंची लोकविलक्षण होती म्हणूनच सर्वमान्य कधीही नव्हती. दिवाकर बहुधा परिचित असतात ते नाट्यछटाकार दिवाकर म्हणून. नाट्यछटासुद्धा बाळबोध. 'फाटलेला पतंग' सारख्या क्रमिक पुस्तकातून सामोऱ्या जाणाऱ्या; पण त्यांचे उत्तमोत्तम साहित्य फार क्वचित प्रकाशित झाले आहे. त्यामुळे खरे दिवाकर फार थोड्या लोकांना माहीत आहेत.

आज जवळजवळ ६८ वर्षांनंतर त्यांच्या साहित्यप्रतिमेला योग्य असा उजाळा मिळाला आहे. १९१२ साली दिवाकरांच्या सदासान्निध्यात असणाऱ्या सनातन पण त्या काळी तितक्याच नवीन असणाऱ्या प्रश्नचिन्हांचे हृदयंगम आवर्त अमोल पालेकरांनी 'दिवाकर' या अनिकेतनिर्मित नवीन नाटकात सादर केले आहे. 'दिवाकर'चा प्रयोग नुकताच छबिलदासमध्ये सादर करण्यात आला. दिवाकरांच्या निवडक कलाकृतींना न्याय मिळवून देण्याचा अतिशय स्तुत्य व प्रामाणिक प्रयत्न त्यांनी केला आहे. एकूण सर्व प्रयोगात नाट्यमूल्य किंवा मराठी रंगभूमीला कलात्मक योगदान वगैरे फारसे नसेलही; परंतु हे सर्व ६-७ नाट्यछटा व एका दीर्घांकाने जोडलेले नाटक अमोल पालेकरांच्या स्वतंत्र शैलीने नटलेले आहे. पालेकर स्कूल ऑफ आर्टस्चा प्रभावी स्पर्श त्या प्रयोगाला झाला आहे. मूळ नाटकाचे ध्येय पालेकरांनी नाटक सादर करताना वापरलेल्या साध्या सुलभ व तितक्याच चपखल तंत्राने पूर्ण यशस्वी झाले आहे; पण पालेकरी तंत्रातच जे अंगभूत दोष आहेत ते मात्र एक दोन नाट्यछटांतून जाणवतात. फार नवीन किंवा वेगळे सांगायचा अट्टाहास नसल्यामुळे प्रायोगिक रंगभूमीवर नेहमी वापरल्या जाणाऱ्या कल्पनांचा सढळ वापर (अर्थात कौशल्यपूर्ण) झाला आहे.

नाटक सुरू झाल्यावर अमोल पालेकर 'निर्मिती संकल्पना व दिग्दर्शन' इत्यादी इत्यादींचे प्रास्ताविक व दिवाकरांच्या आयुष्याबद्दल, त्यांच्या साहित्याबद्दल निवेदन करतात. दिवाकर दत्तकपुत्र होते व घरचे श्रीमंत होते.

परंतु या घरची संपत्ती आपण घ्यायची नाही हा त्यांचा ठाम निश्चय. एका अंधश्रद्धेमुळे मनात कणखरपणे वास करीत असलेल्या निर्वंशाच्या भीतीने त्यांनी त्या संपत्तीला कधीही हात लावला नाही; परंतु दैवदुर्विलास असा की तरीही दिवाकरांचा निर्वंश झाला ! हा विरोधाभास विलक्षण चटका लावून जातो. खरे म्हणजे दिवाकरांचे आयुष्य एकाकी गेले. त्यांना लौकिकदृष्ट्या साथीदार लाभले असतीलही; परंतु संवेदनेचे साथी जवळजवळ नाहीतच. त्यांचा १९१२-१९१३ साली झालेला जीवनविषयक मूलभूत तत्त्वांचा ऊहापोह म्हणजे अंधारात मारलेली असाहाय्य स्वरांची थकलेली हाक होती. त्या वेळच्या सनातनी लोकांना हे कालबाह्य वाटणे अगदी साहजिकच होते; पण आजही दिवाकर संदर्भरहित भासतात ते कशामुळे ? त्यांच्या साहित्याला लिहून बरीच वर्षे दुर्लक्षित लोटली म्हणून ? की योग्य महत्त्वाच्या गोष्टी इतिहास लिहिताना हमखास वगळायच्या या आमच्या जुन्या परंपरेला अनुसरल्यामुळे ?

नाटक सादर करताना विशिष्ट कालखंडाची वातावरणनिर्मिती होण्यासाठी पोषाख-संवादाची ढब जुनीच वापरली आहे. त्यामुळे 'जगणे का ? कशासाठी ? वगैरे अनुत्तरित प्रश्न बालबोध जुन्या वळणाचे साकारत राहातात. सुरुवातीला निवेदन संपल्यावर एक जीवनप्रवासाची एकात्मक नाट्यछटा सादर केली. ही नवोदित कलाकाराकडून सादर केल्यामुळे सफाई कमी वाटते. एकंदर पाच सहा नाट्यछटा वेगवेगळ्या निवेदनानंतर सादर केल्या आहेत. यामधे बुडबुडे, भरचौकात, मी आपला चाललोच आहे, या सरस वाटतात. अन्या

पालेकरांनी 'बुडबुडे' त्यांच्या सुरेख मूकाभिनयाने नटवली आहे. संपूर्ण नाटचछटेत दाटून उरणारी निरर्थकता त्यांच्या चेहेऱ्यावर दिसते. सुरुवातीला थोडचा कमी महत्वाच्या वाटतात व साऱ्या आयुष्याच्या रंगीबेरंगी खेळकर जीवनाचे स्रोत वाटणाऱ्या पाउलवाटा एकाच डांबरी हमरस्त्याने दिशाहीन होऊन भरकटतात. अनेक निरर्थकतेतसुद्धा एक अर्थपूर्ण विश्लेषणात्मक नाते असते. या व अशा अनेक विविध अर्थांच्या रेषा त्या सुबकपणे चितारित जातात. एकाच शब्दात सांगायचे तर ही नाटचछटा म्हणजे अनुभव आहे.

'भर चौकात' हे फार सुरेख जमलेले आहे. गडबड-गोंधळ करायची पालेकरांची एक वेगळी हातोटी आहे. त्यांच्या तंत्रात विशिष्ट आक्रमकता व मृदुता आहे. सायकल स्टेजवर चालवत आणून अधोरेखित झालेला प्रसंग व प्रेतयात्रेच्या आधी आणि नंतर वापरलेले मूकक्षण व पात्ररचनांचा वापर याचे निदर्शक आहे. नंतर सादर केलेल्या नाटचछटांतून दिवाकरांची स्वत:ची स्पंदने जाणवतात. त्यांचे सांसारिक जीवन व त्यामुळे निर्माण झालेले मानसिक कलह यांची दाट छाया या कलाकृतींवर भासते.

१९१२–१९१३ सालचा दिवाकरांचा या मूलभूत प्रश्नांचा ऊहापोह पाहिला की काहीतरी शब्दातीतच वाटत राहते. त्यांच्या 'आंधळे' या Sightless याचा अनुवाद दीर्घांकरूपाने पालेकरांनी सादर केला आहे. त्यात वापरलेली प्रतीके, पात्रे त्यांचे स्वभाव वगैरे एकंदर दीर्घांकाचीच प्रकृती बघितली तर आमची प्रायोगिक रंगभूमी ही त्यापेक्षा फार पुढे गेली आहे असे वाटत नाही.

आश्रमातील आंधळचांचा एक समह आश्रमापासून दूर येऊन एका जागी बसला आहे. या समूहाचे सारथ्य करणारा वृद्ध बेपत्ता झाला आहे व त्या भयाण शांततेत आपल्या दिशाहीनतेचे कोडे प्रत्येक जण आपापल्या बुद्धीनुसार सोडवत आहे. हे गूढ–संशोधन चालू असताना एकजण कशाला तरी अडखळून पडतो. चाचपून पाहतो तर ते एक प्रेत असते. याचा अर्थ असा की समूहातील एक जण मरून गेलाय, या विलक्षण जाणिवेनंतर प्रत्येक जण विदारक फाटलेल्या स्वरात ओरडतो 'मी आहे' फाटून चिंध्या चिंध्या झालेल्या अस्तित्वाचे इतके प्रत्ययकारी वर्णन दुसरीकडे क्वचितच पाहायला मिळेल!

या दीर्घांकात गूढता वाढविणारी सर्व गिमिक्स लिहिताना व दिग्दर्शन करताना वापरली आहेत. शांतता अधिक सखोल करण्यासाठी आंधळचांच्या काठचांच्या विविध लयीतील आघातांचा वापर केला आहे. याचा खरोखरच चांगला परिणाम होतो. दीर्घांकातील सर्वच कलाकार अनुभवी आहेत. त्यामुळे बारीकसारीक तपशील सुद्धा रंगविला गेला आहे. यातील दिलीप कुलकर्णी व अनुया पालेकरांचा अभिनय वेधक वाटला. हेमचंद्र अधिकारींची योग्य साथ संपूर्ण प्रयोगाला लाभली आहे.

'दिवाकर' सादर करण्यामागचा हेतू लक्षात घेता 'दिवाकर' च्या यशाविषयी मूलभूत मर्यादा निर्माण होतात! परंतु एकूण विषयाची हाताळणी कौशल्यपूर्ण असल्याने दिवाकरांना जवळून दाखविण्याचा प्रयत्न यशस्वी झाला आहे हे मात्र निश्चित. □

---

## लोकनायक डॉ. माधव श्रीहरी उपाख्य बापूजी अणे जन्मशताब्दि महोत्सव

# प्रबंध स्पर्धा

वरील समितीतर्फे 'लोकनायक अणे यांचे भारतीय राजकारणातील योगदान' या विषयावर एक प्रबंधस्पर्धा आयोजित करण्यात आलेली आहे.

**प्रबंधस्पर्धेच्या अटी :**

१) या प्रबंधस्पर्धेत पदव्युत्तर विभागातील विद्यार्थ्यांना तसेच विद्यापीठातील सर्व स्तरांवरील प्राध्यापकांना भाग घेता येईल.

२) प्रबंधस्पर्धेतील सर्वोत्कृष्ट प्रबंधाला (प्रथम क्रमांक) ५०० रु. चे रोख पारितोषिक देण्यात येईल.

३) उत्कृष्ट ठरणारा प्रबंध पुस्तकरूपाने छापण्यात येईल व त्याचे सर्व हक्क समितीकडे राहतील.

४) प्रबंधासाठी कमीत कमी ७० व जास्तीत जास्त १०० मुद्रितपृष्ठे ही मर्यादा राहील.

५) प्रबंध मराठीतच लिहिलेला असावा व त्याची शक्यतो टंकमुद्रितप्रत पाठवावी लागेल.

६) प्रबंधस्पर्धेत भाग घेणाऱ्यास १० रु. प्रवेशशुल्क प्रबंधाबरोबत पाठवावे लागेल.

७) प्रबंधस्पर्धेत भाग घेऊ इच्छिणाऱ्याने आपल्या योग्यतेसंबंधी आवश्यक प्रमाणपत्र अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीने पाठविणे आवश्यक आहे. प्रवेशशुल्क व पात्रता–प्रमाणपत्राशिवाय आलेले प्रबंध विचारात घेतले जाणार नाहीत.

८) प्रबंध, 'कार्यवाह–लोकनायक अणे जन्मशताब्दि समिती, वणी, जि. यवतमाळ (४४५३०४)' या पत्त्यावर रजिस्टर डाकेने दि. १५ ऑगस्ट १९८० पर्यंत पोहचतील असे पाठवावे.

९) स्पर्धेसंबंधी परीक्षकांचा निकाल अंतिम राहील. सर्व प्रबंधांचे हक्क समितीकडे व त्यांचा वापर करण्याचा तिला अधिकार राहील.

# चित्रपट

**सदानंद बोरसे**

## दि बर्निंग ट्रेन

**( द बुलेट ट्रेन + द टॉवरिंग इन्फर्नो ) × हिंदी मालमसाला = द टर्निंग ब्रेन**

एका चोप्रांचा (यश चोप्रा) 'काला पत्थर' या नावाचा एक तथाकथित आपत्तिपट काही महिन्यांपूर्वी पुण्यात प्रदर्शित झाला होता. त्याच वेळी पुण्यात प्रदर्शित झालेल्या 'द बुलेट ट्रेन' नावाचा चित्रपट आणि पूर्वी प्रदर्शित झालेला 'द टॉवरिंग इन्फर्नो' नावाचा चित्रपट यांची बेरीज करून त्याला दोनाने भागले आणि हिंदी चित्रपटातील प्रेम, स्मगलिंग, कव्वाली, नाचगाणी इत्यादी मालमसाल्याने गुणले की आणखी तीन चोप्रांचा (निर्माता–बी. आर. चोप्रा, कथा-लेखक, दिग्दर्शक–रवी चोप्रा, छायाचित्रकार–धरम चोप्रा) 'दि बर्निंग ट्रेन' हा नुकताच दाखल झालेला चित्रपट तयार होतो

दिल्ली ते मुंबई हा प्रवास चौदा तासांमध्ये करणारी प्रचंड वेगाने धडाडत जाणारी सुपर एक्स्प्रेस. इंजिनात झालेल्या टाइम–बाँबच्या स्फोटामुळे आणि गाडीचे ब्रेक निकामी झाल्यामुळे ही गाडी थांबवता येत नाहीये. त्यात त्या गाडीच्या काही डब्यांना आग लागलीय आणि अशी ही जळती गाडी पोटातील पाचशे जिवांना घेऊन मरणाच्या दिशेने सुसाट धावत आहे. (चोरलेली असूनही) बऱ्यापैकी काळजात लक् करणारी कल्पना आणि या जीवन–मरणाच्या झगड्यात उठून दिसणाऱ्या थोड्याशा व्यक्तिरेखा सोडल्या; तर बाकी चित्रपट म्हणजे 'प्रत्यक्ष धडाडत जाणारी प्रत्यक्ष खेळातील आगगाडी प्रत्यक्ष पहाच!' पाचशे प्रवाशांनी भरलेली आगगाडी ही कल्पना म्हणजे चित्रपट नवरसांच्या आगीने धडाडून पेटवायला पटकथाकार कमलेश्वरांच्या हाती कोलीतच मिळाले आहे. (त्यात आणखी चित्रपटाचे संवादही त्यांचेच आहेत.) मग या पाचशे जणांमध्ये प्रेमभंगाच्या फुफाटयातून या जळत्या रेल्वेच्या आगीत येऊन पडलेला अशोक (धर्मेंद्र) आहे, आपल्या तुटक्या पायामुळे प्रेम निभावून न्यायला आपण कसे बेबस होतो हे भर आगीत 'उस वक्त मेरी वफा का तकाज़ा यही था कि बेवफा बन जाऊँ।' अशा पल्लेदार वाक्यांनी ऐकवणारी सीमा (हेमामालिनी) आहे, स्वतःच्या लग्नाच्या वेळीच घरून पळून निघालेली खऱ्या प्रेमाच्या शोधात असलेली तरुणी (नीतू सिंग) आहे, पाकीटमार असलेला पण रेल्वेला आग लागताच त्या संकटातून बाहेर पडण्यासाठी अशोकबरोबर सुपरमॅनला लाजवणाऱ्या कारवायांमध्ये भाग घेणारा रवी (जितेंद्र) आहे (शिवाय या दोघांचा 'पल दो पल का साथ हमारा, पल दो पल का याराना है' या कव्वालीच्या निमित्ते एक खणखणीत नाचही आहे), आता मरण निश्चित आहे हे माहीत असूनही आगीत जखमी झालेल्यांवर उपचार करणारा डॉक्टर (नवीन निश्चल) आहे, आगीत होरपळून मरणारे नवविवाहित जोडपे आहे, संकटाच्या ऐन वक्ताला लाल कपडा पाहिजे म्हटल्यावर अंगावरची लाल साडी फेडून देणारी रामकली वेश्या (आशा सचदेव) आहे, जिथे तिथे ट्रांझिस्टर वाजवत फिरणारे एक पोरगे आहे. (शिवाय शाळेच्या ट्रिपच्या निमित्ताने एक मोठी बालपलटण असूनही ती अत्यंत निरुपद्रवी आहे), एक बढाईखोर मेजर (असरानी), एक मौलवी (युनूस परवेज), एक पंडित (राजेंद्रनाथ), दोन तिकिटचुकवे, एक सरदारजी, एक पठाण आणि हो एक स्मगलर (रणजित) आणि त्याच्या मागावर एक सी. आय. डी. इन्स्पेक्टर (सुजीतकुमार)सुद्धा आहेत. 'नमुना तितुका मेळवावा' या तत्त्वावर गोळा केलेल्या या एवढ्या लोकांच्या हातून काही फुटकळ आणि गदळ विनोद, आचरटपणा आणि किंचाळ्या याशिवाय फारसे काही घडतच नाही! अपवाद अर्थातच धर्मेंद्र व जितेंद्र या अवतारी पुरुषांचा. हिंदी चित्रपटांचे हिरो म्हणूनच ते या जळत्या गाडीत बसल्यामुळे चालत्या गाडीचा मोटारसायकलवरून पाठलाग करून गाडी पकडणे, एवढ्या प्रचंड वेगाने धावणाऱ्या गाडीत बाहेरून एका डब्यातून दुसऱ्या डब्यात जाणे, टपावर जाणे, अजिबात न हालता टपावर उभे राहणे इतकेच नव्हे तर टपावर स्वतः न पडता (आणि खलनायकालाही न पाडता) मारामाऱ्या करणे, कोलांटयाउड्या मारणे इत्यादी अनेक प्रकार ते दोघे लीलया करतात. पुढे विनोद खन्ना ऊर्फ विनोद या नावाचा आणखी एक हिरो त्यांना सामील होतो आणि मग सर्व कारवाया तिघे मिळून सुरू करतात.

चित्रपटाचे छायाचित्रण हा चित्रपटातील अत्यंत विनोदी भाग आहे. चित्रपटाच्या कुठल्याही दृश्यात या संकटाची भीषणता,

मरणाच्या दाढेतून चाललेला हा प्रवास जाणवतच नाही. चित्रपटातील अत्यंत उथळ प्रसंग ज्याप्रमाणे ही भीषणता अतिशय अळणी करून टाकतात त्याप्रमाणेच उघड-उघड कृत्रिम वाटतील अशी घेतलेली दृश्ये हा भयंकरपणा अतिशय खोटाखोटा बनवून टाकतात. चित्रपटात आधी उल्लेखिलेल्या ज्या अतर्क्य गोष्टी दाखवल्या आहेत (चालत्या गाडीच्या टपावर उभे राहणे, चालणे, मारामाऱ्या करणे, एका वेगाने धावणाऱ्या इंजिनातून सुपर एक्स्प्रेसमध्ये प्रवेश करणे इत्यादी) त्या आत्यंतिक अवास्तव वाटण्यामध्ये छायाचित्रणाचा वाटा सिंहाचा आहे. त्यामुळे कथेतून वा पटकथेतून या संकटात सापडलेल्या विविध व्यक्तिरेखांचे पैलूही धड उभे राहात नाहीत आणि छायाचित्रणातून त्या संकटाचा भयंकरपणा, होऊ घातलेला विध्वंसही डोळ्यांपुढे आकार घेत नाहीत. चित्रपटातील एकमेव थोडीफार पटणारी गोष्ट म्हणजे गाडीच्या प्रवासाच्या मर्यादित कालखंडात (जो आधीचा तिच्या न थांबणाऱ्या वेगामुळे ठरल्यापेक्षा कमी झालेला आहे, तिच्यातील पाचशे जीव वाचविण्यासाठी बाहेरून चाललेली धडपड. या धडपडीतही काळ या प्रकारचा संदर्भ हरवल्यासारखा होतो आणि जेमतेम सात-आठ तासांत एक मैल लांबीचा चढा लोहमार्ग बनविणे, हेलिकॉप्टरने गाडीवर उतरण्याचा प्रयत्न करणे इत्यादी घटना घडत राहतात; पण तरीही आकाशवाणीवरून करण्यात येणारे प्रक्षेपण, गाडीच्या प्रवासावर सतत कंट्रोलरूममध्ये ठेवलेली नजर, गाडीत आग लागलेली लक्षात येताच वाटेतील स्टेशनांवरून तिच्यावर केलेला पाण्याचा मारा इत्यादी घटना बऱ्याच डोके (स्वतःचे की दुसऱ्याचे ?) वापरून घेतलेल्या.

या गोष्टी गाळून काढल्यानंतर मग उरतो तो सगळा धंदेवाईक हिंदी माल-मसाल्याचा गाळ. त्याबद्दल अधिक लिहिणे नकोच !

चित्रपटात अनेक नामवंत नट-नटयांची मोठी फलटण असली तरी धर्मेंद्र, जितेन्द्र, विनोद खन्ना व डॅनी डेंझोंपा यांच्याव्यतिरिक्त बाकी कोणालाच फारसा वाव नाही. हेमामालिनी, परवीन बाबी, नीतू सिंग इत्यादी फक्त शोभेच्या कचकडी बाहुल्या आहेत. आता आधीच्या चौघांनीही सराईतपणे आपली कामे उरकून टाकलेली.

गीतकार साहीर आणि संगीतकार राहुलदेव बर्मन आहेत. चित्रपटातील 'पल दो पल का साथ हमारा' ही कव्वाली श्रवणीय आहे; पण संगीत हा प्रकार चित्रपटाचा दर्जा सुधारण्यास अजिबातच हातभार लावत नाही.

चित्रपट पाहिल्यानंतर कुणीसे केलेले त्याचे 'दि टर्निंग ट्रेन' हे रूपांतर एकदम आवडले.

●

# स्वयंवर

## बी. नागी रेड्डींचे प्रमेय

प्रमेयाचे विधान–देवपार्टी आणि राक्षसपार्टी यांच्या संघर्षातून देवपार्टीचा विजय दाखविणारा नवरसप्रधान कौटुंबिक ( अर्थातच दिलफोडक, हृदयतोडक वगैरे ) चित्रपट गल्ल्यावर हमखास यशस्वी होतो.

गृहीत– बी. नागी रेड्डींचा हमखास रौप्य-महोत्सव साजरा करणारा चित्रपट,

साध्य– चित्रपट देवपार्टी आणि राक्षसपार्टी यांच्या संघर्षातून देवपार्टीचा विजय दाखविणारा नवरसप्रधान कौटुंबिक (अर्थातच दि. फो. हृ. तो. वगैरे ) आहे, हे सिद्ध करणे.

आकृती– बी. नागी रेड्डींचे यापूर्वीचे नन्हा फरिश्ता, घर घर की कहानी, स्वर्ग-नरक इत्यादी चित्रपट आणि आताचा स्वयंवर हा चित्रपट.

रचना– स्वर्गीय चक्रपाणी यांची अन्य भाषांमध्ये गाजलेली कथा. दोन तरुण भाऊ ( नावे अर्थात राम-लक्ष्मण-संजीवकुमार शशीकपूर ) दोन तरुण बहिणींच्या ( नावे जानकी–उर्मिला का बरे नाहीत ? अ त्यांची नावे शांती रूपा विद्या सिन्हा-मौः चटर्जी ) मागे लागलेले. शांती नावाप्र शांत, सोशिक वगैरे. तिला सावत्र त्यामुळे अर्थातच तिचा छळ वगैरे. (अर्थ स्त्री प्रेक्षकांमधून हुंदके, रुमालात शिकरणे वगैरे ) रूपाची आई सख्खी व ल्याने ती जरा माजोरी–आपलं नटखट,शे मग पुढे संसार, पती हाच देव, प्रेम हेच आणि अमुक हेच तेच असे बरेच काही ति कळल्यानंतर तिची झालेली सुधारणा. दरम्यान दुर्गाबाई ( नादिरा ) या कैके कौसल्येत रूपांतर होणे आणि माखनल ( मदनपुरी ) या कंसमामाची त्या बायको–मुलासकट (अनुक्रमे शशिकला अ रणजित )भली खोड जिरणे. शेवटी स्वयं अर्थात सनईची ट – ट – ट – ट – टां – टां ऽ

रचनेचे स्पष्टीकरण– दोन भाऊ, द बहिणी घेतल्या की, दोन हिरो, दोन हिर इन घ्यायचा चान्स मिळतो. त्यात ए कामाला चांगला / चांगली ( उदाहरणा संजीवकुमार, विद्या सिन्हा ) आणि ए दिसायला चिकणा / चिकणी ( अर्थात श कपूर, मौशमी चटर्जी ) असे विभाजन कें तरी चालते. एवढया गोष्टी केल्या आ आपल्या चोखंदळ (?) प्रेक्षकाच्या कपा मारल्या की झाले !

कृती – रचनाच अत्यंत बोलकी असल्या कृतीची आवश्यकता नाहीच.

हिंदी चित्रपटसृष्टीत बी. नागी रेड्डीं प्रमेय इतरही अनेक चित्रपटांना आधारभू ठरलेले आहे.

